म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ८०८०

# नवी गृहस्ते

IRBK-0104060
IRBK-0104060

गोपीनाथ तळवलकर


नवीं

24 SEP 1977

दा० कृ० ४०८०.

श्रीसमर्थ-सदन-बाल-प्रकाशन

१३८

# नवीं गृहरत्नें

लेखक

गोपीनाथ तळवलकर

९८०४२
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
ग्रंथालय

क्र. ४०८० वा वि
दि. ९१.९१.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य एक रुपया

सर्वाधिकार सुरक्षित

●

प्रथमावृत्ति : १९४८

पुनर्मुद्रण : १९५२

●

मुद्रक

बा. ग. ढवळे

कर्नाटक मुद्रणालय

चिराबाजार, मुंबई २

●

प्रकाशक

के. भि. ढवळे

श्रीसमर्थ-सदन

गिरगांव, मुंबई ४

माझे प्रिय मित्र

श्री. भय्यासाहेब उमराणी

प्रा. गंगाधर भा. निरंतर

प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर

ह्यांस ....

—गोपीनाथ

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

कल्पनेची बाधा
न हो कोणे काळीं
ही संतमंडळी
सुखी असो

IRBK-0104060
IRBK-0104060

# दोन शब्द

गृहरत्नांची ही दुसरी माला महाराष्ट्रवाचकांना सादर करतांना मला अत्यानंद होत आहे. मागील गृहरत्नांचें स्वागत वाचकांनीं ज्या उत्साहानें केलें त्याच उत्साहानें ह्याही गृहरत्नांचें केलें जाईल ह्याची खात्री वाटते.

मुलांचीं स्वतंत्र स्वभावचित्रें हा वाङ्मयप्रकार मीं कांहीं वर्षांपूर्वीं 'संजीवनी' मासिकांतून सुरू केला. त्याला अपेक्षेपेक्षां अधिक यश मिळालें. प्रस्तुत पुस्तकांत जे कांहीं आणखी नवीन प्रयोग केलेले दिसतील किंवा ह्या वाङ्मयप्रकाराचा जो विकास दिसेल त्याला कारण हें यशच आहे; म्हणून हें यश ज्यांच्या रसिकतेनें मिळवून दिलें त्या वाचकांचे प्रथम आभार मानले पाहिजेत.

प्रस्तुत पुस्तकांत एका बालसदृश श्वानराजाचें शब्दचित्र आहे. तसेंच एका मंदबुद्धि पण भावनाप्रधान मुलाचेंही वर्णन ह्यांत आढळेल. पूर्वी शब्दचित्रें लिहितांना मी माझ्या स्वतःच्याच अनुभवावर विसंबून राहीं. मूल आपणांशीं वागतांना ज्या लीला व जी हुशारी दाखवील तेवढीच मी शब्दचित्रांत घेत असे. पण मग असें दिसून आलें कीं मूल आपलें सर्व व्यक्तित्व व सौंदर्य एकाच व्यक्तीपुढें प्रकट करीत नाहीं. आई, वडील, भावंडें, मित्र ह्यांच्या सहवासांत भिन्नभिन्न प्रसंगीं मुलाच्या स्वभावाचे व सामर्थ्याचे वेगवेगळे पैलू दिसतात. तेव्हां ह्या सर्व ऋणानुबंधी लोकांचे अनुभव जमेस धरून मीं ह्या पुस्तकांतील शब्दचित्रें लिहिलीं आहेत. कमळ स्वतंत्रपणें सुंदर दिसतेंच, पण सरोवराच्या वातावरणांत त्याची शोभा केवळ अपूर्व दिसते. म्हणून कांहीं ठिकाणीं मुलांभोवतीं जें रमणीय वातावरण होतें तें चित्रित करून मूळ विषयाचें सौंदर्य उत्कट करण्याचा प्रयत्न केला आहे.

हीं 'नवीं गृहरत्नें' लिहितांना अधिक काय केलें ह्याचें हें निवेदन झालें. हीं शब्दचित्रें रेखाटण्यांत मीं ह्या खेळकर गृहरत्नांच्या सहवासांत घेतलेला अनिर्वचनीय आनंद अंशतः सांठवून ठेवणें हाच प्रमुख हेतु आहे. माझ्या 'गृहरत्नां' संबंधीं लिहितांना सौ. सरोजिनीबाई मुंग्रे ह्यांनीं असे उद्गार काढले

आहेत कीं "हीं वाचून तुम्ही आपल्या मुलांवर अधिक प्रेम करायला शिकाल." ह्या प्रशंसोद्गारांची मातब्बरी मला फार वाटते. आपल्या घरांतल्या बालगोपालांच्या अंगीं असलेलीं गुप्त सामर्थ्यें व अगाध सौंदर्यें पाहाण्याचें तंत्र ह्या गृहरत्नांवरून वाचकांना अवगत झालें तर मला आणखी काय पाहिजे? पण हें तंत्र आत्मसात् करण्यासाठीं मुलांकडे पाहाण्याची आपली दृष्टीच बदलली पाहिजे. मूल हें खेळणें नसून तो एक सृष्टिचमत्कार आहे, भवितव्यांत प्रकट होणाऱ्या विशाल शक्तींचें तें एक बीजस्वरूप आहे अशी वृत्ति मुलांशीं खेळतांना ठेविली पाहिजे. त्याला शिकविण्यासाठीं नव्हे, तर त्याच्यापासून शिकण्यासाठीं आपण त्याला खेळवायचें असतें. "**बालगुरो! शिकवा कधिं असे चुकल्यामुकल्यासी**" ही साधकाची भूमिका घेतली तरच बालकांच्या मेळाव्यांत आपणांला स्वर्ग दिसूं शकेल. आपल्या तरल कल्पनेला अगम्य अशा गोष्टी मुलें आपणांला सांगतात. त्यांचा अहंकार, त्यांचें तर्कशास्त्र, त्यांची सौंदर्याभिरुचि, सर्व सर्व कांहीं स्वतंत्र असतें. आपण तें सर्व पाहून थक्क होऊन जातों. पण बालकांतील विराट् स्वरूपाचें दर्शन होण्यास दिव्य दृष्टि मिळविली पाहिजे आणि ती दृष्टि बालकांकडूनच मिळवावी लागते. 'गृहरत्नें' वाचून एवढी जाणीव निर्माण व्हावी अशी अपेक्षा आहे.

एखाद्या थोर पुरुषाचें शब्दचित्र तुम्हीं रेखाटलें तर आपली कीर्ति विसरून तो तुमच्या कलेबद्दल कृतज्ञता व्यक्त करील. निदान अंतरंगांत तरी तो तुम्हांला धन्यवाद देईल. पण मीं ज्यांचीं शब्दचित्रें ह्यांत रेखाटलीं आहेत त्यांच्याकडून असल्या कृतज्ञतेची आशाच नको! मी हीं गृहरत्नें जसजशीं लिहीत गेलों तसतसे ह्या मंडळीचे नवे नवे अनुभव मला मिळाले. 'मोती' बद्दल बोलायचीच सोय नाहीं! आमचे आचार्य 'वसंत' राव ह्यांना स्वतःचें शब्दचित्र आल्याची बातमी कळली, तेव्हां 'बरं' एवढेच उद्गार काढून ते खिडकींतून निर्विकार मनानें दूरवर पाहूं लागले! 'अरे, तुझ्यावर नानांनीं लिहिलेलं पाहिलंस का?' असें 'चंदू' ला कोणीं म्हणतांच 'ए–' असें रागानें म्हणून त्यानें हातांतला दांडू सरसावला. जणूं काय कांहीं बदनामीकारक गोष्टच घडली! 'प्रमोद' आपलें फक्त नांव वाचून खेळायला निघून गेला! 'नंदू' कांहीं विशेष बोलला नाहीं; पण पुढें मीं जेव्हां जेव्हां त्याच्याकडे जाई तेव्हां तेव्हां आस्थेनें घरांत एखादी नवी घडलेली गोष्ट कानांवर

घालून तो निघून जाई. 'लता', 'मोहन', 'शशिकान्त', इत्यादि मंडळी मात्र स्वतःचें शब्दचित्र आलें आहे ह्यांत कांहींतरी कौतुक झालें इतपत मानूं लागली. पण त्यांनाही लेखकाला दुवा देण्याची मुळींच आवश्यकता वाटली नाहीं! असो. ह्या शिशुमंडळीची ही हृदयंगम बेपर्वाई मला धन्यवादाच्या लाखो शब्दांपेक्षां अधिक चित्ताकर्षक वाटते. पण ह्या रोपांतलेच उद्यां कांहीं विराट् वृक्ष होतील, हजारोंना सावली देतील, तेव्हां कोणत्या चिमण्या रूपांत हीं बाळें वागडत होतीं हें भविष्यकालांत त्यांचे भक्त पाहूं लागतील; कदाचित् त्यांना स्वतःलाही आपल्या बालरूपाचें दर्शन घेण्यांत मौज वाटेल. त्या मंगल कालीं ह्या पुस्तकाचें पुनः एकदा नवें स्वरूप दिसेल अशी आशा वाटते.


गोपीनाथ तळवलकर

आनंद कार्यालय, पुणें २

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. अरुणा | ... ... | ९ |
| २. प्रमोद | ... ... | १३ |
| ३. मीना | ... ... | १७ |
| ४. चंदू | ... ... | २० |
| ५. लता | ... ... | २४ |
| ६. गोविंद आणि गोपाळ | ... | २७ |
| ७. नंदू | ... ... | ३० |
| ८. अरुण | ... ... | ३४ |
| ९. श्रीराम | ... ... | ३८ |
| १०. मोहन | ... ... | ४२ |
| ११. वसंत | ... ... | ४६ |
| १२. ललिता | ... ... | ५० |
| १३. शशिकान्त | ... ... | ५३ |
| १४. मोत्या | ... ... | ५६ |


★




अरुणा आज किशोरी दिसत असली तरी तिचें मन अजून अजाण आहे. तिच्या खेळकर भाबडेपणाला समजुतीची बाधा झालेली नाहीं; बहुधा कधींच होणार नाहीं.

वेलीच्या फांदीवर बसुनी
झोके घ्यावे, गावीं गाणीं
याहुनि ठावें काय तियेला
साध्या भोळ्या फुलराणीला !

ह्या ओळी मीं लहानपणीं वाचल्या होत्या. त्या मधुर वाटत. पण अरुणा दृष्टीस पडेपर्यंत त्यांचें खरें सौंदर्य कळलें नव्हतें. गेलीं आठ वर्षें मीं अरुणाला पाहात आहें. तिचा मुखचंद्र अधिक वाटोळा व प्रसन्न होत आहे, पण गांभीर्याची छाया त्यावर पडलेली नाहीं. झगा जाऊन गोल साडी आली, पण तिच्या विशाल डोळ्यांत संकोच अणुमात्र नाहीं. ती प्रियमण्डना आहे, पण तिच्यांत अहंकार नाहीं. तिच्या वेषभूषेला हेतु नसतो. घटकेंत पिवळी साडी

नेसेल, कांहीं वेळानें ती सोडून तांबुस जॉर्जेटचें पातळ परिधान करील; चक्कर उलगडून शेपटा सोडील. एकदा मागल्या पुढल्या आळींत फेरा मारून येईल. एकटीच उभी राहून "मैं क्या जानुं क्या जादु है" अशी ललकारी सोडील, पुनः मंडळींत येऊन गोष्टी ऐकत बसेल. सुसूत्रता, अभिमान, समजूतदारपणा ह्यापलीकडच्या आनंदाचा ठेवा अरुणाला जन्मतःच मिळालेला आहे.

गुजराथच्या राजधानींत ती राहाते. शेजारही गुजराथ्यांचाच आहे. आपल्या आळींत ती शिरली कीं, 'केम अरुणाबेन?' अशीं प्रेमळ संबोधनें चोहोंकडून ऐकूं येऊं लागतात. संसारपीडितांना तिच्याशीं बोलण्यानें थोडा दुःखांत विरंगुळा वाटतो. आनंदी जीवांचा आनंद तिला पाहिल्यानें द्विगुणित होतो.

अरुणाच्या घरासमोर एक म्हातारी गुजराथी बाई राहाते. तिच्या वयाचा अंदाज करणेंच कठीण आहे. "झांशीच्या राणीचा पाळणा मी हलवीत असें" असें जरी तिनें सांगितलें तरी तुम्ही त्यावर विश्वास ठेवाल. दुसऱ्या बाजीरावाच्या गोष्टी अनुभवाच्या रुबाबांत ती सांगूं लागली तरी तुम्ही त्या श्रद्धेनें ऐकाल. ह्या इतिहासकालीन वृद्धेचें नांव 'धुरी.' ती अरुणाशीं बोलत बसलेली पाहिली म्हणजे भूत आणि भविष्य एकमेकांशीं कानगोष्टी करीत आहेत असें वाटतें. धुरी अंध झाली आहे. अरुणाचें बालपणींचें सौंदर्य तिनें डोळे भरून पाहिलें आहे. :पण: अलीकडील अरुणाची वाढती शोभा तिला कल्पनेनेंच जाणावी लागते. नववधूच्या वेषांत अरुणाचा मुखचंद्र पाहाण्याची तिची इच्छा होती! पण आतां तिला अंतःचक्षूंनींच ती इच्छा पुरी करून घ्यावी लागणार!

'धुरी' ला अरुणाविषयीं काय वाटतें हें सांगणें कठीण आहे. पण तिनें अरुणाला आपला जितका जीवनेतिहास सांगितला आहे तितका कोणालाही सांगितला नसेल. तसें पाहिलें तर अरुणाला स्वतःच्या जीवनाविषयींही विचार करण्याचें ज्ञान नाहीं, दुःखी जनाचें सांत्वन करण्याचें कौशल्य नाहीं आणि अश्रूंनीं अश्रु धुऊन टाकण्याची कला साध्य झालेली नाहीं. पण 'धुरी' च काय, कित्येक अशीं मोठीं माणसें आहेत कीं अरुणाच्या पुढें आपली शोककथा सांगितली तरी त्यांना हलकें वाटतें.

अरुणाला कामाचा कंटाळा मनस्वी आहे. पण 'धुरी' ला दुपारीं अडीच वाजतां चहा द्यायचें व्रत ती कधीं चुकणार नाहीं. मैत्रिणींच्या घोळक्यांत खेळामध्यें ती दंग झालेली असो किंवा घरीं केलेल्या पक्वान्नांचें जेवण झाल्यामुळें

किंचित् झोपेच्या गुंगींत असो ; अडीचचा ठोका पडतांच ती उठेल, चहा करील, 'धुरी' च्या खोपटांत जाऊन चहा तिच्या कपांत ओतील आणि तिचा हात कपाला लावून देऊन परत येईल !

अरुणाला सुंदर वस्त्रांचा व दागिन्यांचा भरपूर षोक आहे. पण प्रिय मैत्रिणींना अथवा बहिणींना आपलीं झगझगीत पातळें देण्यास ती मागेंपुढें पाहात नाहीं. स्वतःच्या विवाहाविषयीं गोष्टी निघाल्या कीं मोकळ्या मनानें ती भाग घेते ! अशा वेळीं लाजून खालीं पाहात बसावें किंवा रागानें दूर निघून जावें हें तिला ठाऊक नाहीं. घरांतली मंडळी गप्प बसली तरी ती अस्वस्थ होते. पण एखादा विषय पंधरावीस मिनिटांच्या वर चाललेलाही तिला आवडत नाहीं. "आतां दुसरं कांहीं काढा ना !" असा कंटाळून ती पुकारा करते.

ती धाकट्या भावाशीं भांडेल, त्याच्यावर रागावेल आणि त्याची कोणी स्तुति करूं लागलें तर चिडेलही. पण तो दूर झाला कीं सतरांदा त्याची आठवण काढून बेचैन होईल. उद्यांचा विचार ती करीत नाहीं आणि एखाद्या वेळीं करूं लागली तर आपल्या मृत्यूपर्यंत येऊन थांबते. "अठराव्या वर्षीं आपण मरणार आहों. कशाला चिंता करा पुढची ?" असें तिचें म्हणणें असतें. स्वतःच्या मृत्यूचें हें भविष्य अरुणाच्या बालमनानें कोणाकडून वर्तवून घेतलें, कळत नाहीं. पण तीही एक सिद्ध गोष्ट आहे असेंच अरुणा समजते आणि शिवाय पुढचा गुंतागुंतीचा विचार करण्याची दगदग पडत नाहीं हा काय कमी फायदा ! पण ह्या मृत्यूच्या कल्पनेनें तिच्या आनंदांत मात्र रतीभर उणेपणा येत नाहीं.

प्रियजनाचा विरह अरुणाला मुळींच सहन होत नाहीं. तिची वडील बहीण सुशीला जेव्हां माहेरास येते तेव्हां अरुणाला 'सर्व सुखाचें आगर' आल्यासारखें वाटतें. मग तिचा सारा वेळ बहिणीच्या तैनातींतच जातो. कोठल्याही क्षणावर ती आपला हक्क सांगत नाहीं. तिला स्वतःची अशी करमणूक राहात नाहीं आणि सुशीलेचा परत सासरीं जाण्याचा दिवस जसजसा जवळ येत जाईल तसतसें अरुणाच्या आनंदाला ग्रहण लागत जातें. विरहाच्या नुसत्या कल्पनेलाही ती भीत असते. सुशीलेच्या जाण्याच्या गोष्टी कोणी काढल्या तर अरुणा त्याला हटकते. "हें काय रे भाऊ,—अजून कितीतरी दिवस आहेत जायला तिला. आजच कशाला त्या गोष्टी काढतां ?" अशा हरकतीच्या भाषणानें ती दुसऱ्याला विषयान्तर करायला लावते.

अरुणाला समजूत यावी असें वाटतें. पण त्याच क्षणीं समजुतीनें तिच्या निष्पाप माधुर्याला बाध येईल कीं काय ही शंका आल्यावांचून राहात नाहीं. अरुणा हें एक मनोहर स्वप्न आहे, पण तिला शहाणपण आलें तर ह्या स्वप्नांतले रंग उडून तर जाणार नाहींत ना? तथापि आज ना उद्यां तिला व्यवहाराच्या भूमीवर उतरावें लागेल आणि ह्या अजाण सुंदरतेची मातब्बरी रुक्ष व कठोर व्यवहाराला राहील का? खास नाहीं! मग जाणतेपणाचा उदय हिच्या अंगीं नको का व्हायला? अशा गोंधळांत माझें मन नेहमीं सापडतें आणि शेवटीं असें वाटतें, अरुणाच्या भाबड्या मोहकतेचा रंग थोडा फिक्का झाला तरी चालेल, पण व्यवहारी जगांत माणसाला सुखी करणारी बुद्धि तिला येऊं दे. अरुणाच्या नाचण्याबागडण्याच्या मागें मला कविवर्य तांब्यांच्या पुढील ओळींचें पार्श्वसंगीत नेहमीं ऐकूं येतें —

नदिपल्याड ग पल्याड त्या रानाच्या
कुणि असेल ग भाग्याचा.
कुणि येइल ग येइल ग न्यायाला
या नाजुकशा कमळाला.

★

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.




बादशहा जहांगीर सहा सात वर्षांचा असतांना कसा दिसत असेल ह्याची तुम्हांला कांहीं कल्पना करतां येते का ? गोरापान रंग, रेखीव नाकडोळे, चेहेऱ्यावर विलासप्रियतेचा भाव आणि प्रभुत्व गाजविण्याची वृत्ति, बुद्धीचें तेज, बेपर्वाई, उनाडपणा ह्यांचें मिश्रण — प्रमोदला पाहिलें कीं ह्याच वर्णनाचा शहाजादा सेलिम आपल्यापुढें उभा आहे असा भास तुम्हांला होईल आणि एकदम तुम्हांला ' कुर्निसात ' करावासा वाटेल.

लहान मुलांच्या एका संमेलनांत मीं प्रथम त्याला पाहिलें. मांडचोळणा, त्यावर रेशमी शर्ट आणि पायांत चढाव असा त्याचा थाट होता. संमेलन सुरू होण्यापूर्वी थोडा वेळ तो आला. संमेलनांत काय कार्यक्रम होणार ह्याविषयीं तर त्याला कुतूहल होतेंच, पण आपली जागा कोठें आहे, प्रमुख ठिकाणीं आपण बसूं शकूं कीं नाहीं, ह्याची फिकीर त्याला विशेष लागलेली दिसली. प्रथम मुलांत त्याला बसविण्यांत आलें, तेव्हां तो अस्वस्थ झालेला दिसला. पण लवकरच वडिलांच्या शेजारीं त्याला खुर्ची मिळाली आणि मग मात्र

आपल्या दर्जाला अनुरूप असें आसन मिळाल्याचें समाधान त्याच्या चेहेऱ्यावर दिसूं लागलें.

प्रमोदविषयीं प्रथम दोन तीन गोष्टी माहितीकरितां म्हणून तुम्हांला सांगितल्या पाहिजेत. टिळकतलावानजीक एका प्रशस्त बंगल्यांत तो राहातो. त्याचे वडील एक प्रसिद्ध लेखक, नट व सिनेमा-डायरेक्टर आहेत आणि त्याची आई व मावश्या सुविद्य आहेत. घरचें एकंदर वातावरण आधुनिक आहे.

घरीं येणारीं वर्तमानपत्रें व मासिकें प्रमोद काळजीपूर्वक पाहातो. हिटलर-मुसोलिनींच्या हालचालींकडे विशेष दक्षतेनें पाहाण्याची त्याची प्रवृत्ति आहे. युरोपमधील ह्या राक्षसी हुकूमशहांना आपल्या आळींतल्या रांगड्या पोरांपेक्षां तो अधिक किंमत देत नाहीं ! महायुद्धाचें पुढें काय होईल ह्यासंबंधीचे कांहीं आडाखे त्यानें बसवले आहेत. वृत्तपत्रांतील मजकूर, फार काय पण जाहिराती सुद्धा, प्रमोद नीट लक्षांत ठेवतो आणि प्रत्यक्ष व्यवहारांत आपल्या माहितीचा तो अचूक उपयोग करतो.

एकदा काय झालें, प्रमोदची आई त्याला घेऊन आपल्या एका मैत्रिणीकडे गेली. त्या मैत्रिणीकडे थोडी पोक्त दिसणारी एक स्त्री प्रमोदनें पाहिली. मैत्रिणीची ती वडील बहीण असावी असा प्रमोदनें कयास बांधला. पण त्याच्यानें राहावेना म्हणून ' ह्या कोण ? ' असें आईला त्यानें विचारलें. आईनें त्याला ती आपल्या मैत्रिणीची आई आहे असें सांगतांच प्रमोदमहाशय चकित होऊन पाहूं लागले. ' अरे वा, बऱ्याच तरुण दिसतात कीं ह्या ! ' त्यानें शेरा मारला. सर्व मंडळी हसूं लागली. इतक्यांत कोणींसें विचारलें, ' का रे प्रमोद ! ह्या कशा रे तरुण राहिल्या ? ' प्रमोदनें किंचत् विचार केल्यासारखें केलें आणि चटकन् उत्तर दिलें, ' बहुतेक क्रूशेन सॉल्ट घेत असतील त्या. ' मंडळींची हसून हसून पुरेवाट झाली !

धीटपणांत आणि बेडरपणांत प्रमोद कोणाला हार जाणार नाहीं. एकदा सुटींत मावशीकडे नगरला गेला होता तो. गड्यानें त्याला एके दिवशीं संध्याकाळीं हिंडायला नेलें. येतांना एक सिनेमा थिएटर लागलें. आज सिनेमा पाहायचा असें प्रमोदनें ठरवलें. गड्याजवळ पैसे नव्हते, तेव्हां हे छोटे पाहुणे सिनेमा कसा पाहाणार, हें कांहीं त्याला कळेना. प्रमोदनें गड्याला सिनेमाच्या व्यवस्थापकाकडे आपणाला घेऊन चलण्याविषयीं फर्मावलें. व्यवस्थापकाची गांठ पडतांच प्रमोदनें त्याला सांगितलें,

"अहो, तुम्हीच का मॅनेजर? आम्हांला सिनेमाला बसायचं आहे."

"मिस्टर, पण तुमचं तिकिट कुठं आहे?" मॅनेजरसाहेबांनीं हसें आंतल्या आंत दाबीत म्हटलें.

"आम्ही तिकीट कधींच काढत नाहीं. मी डायरेक्टर * * * आहेत ना, त्यांचा मुलगा. आम्हांला सिनेमाला नेहमीं तिकिटाशिवायच बसवतात."

अखेर हे 'सन्माननीय' बाळ—पाहुणे त्या दिवशीं फुकटांत सिनेमा पाहून गड्याच्या डोक्यावरून डुलत डुलत घरीं आले.

प्रत्येक गोष्टींत आपणाला स्वतंत्र मत आहे आणि तें न भितां सांगणें ही एक सामाजिक जबाबदारी आपल्यावर आहे, असें प्रमोदला वाटतें. 'आनंद' मासिकांत एका प्रसिद्ध लेखकाची गोष्ट आली. ती प्रमोदला फार आवडली. पुढें एके दिवशीं सदर लेखक प्रमोदच्या वडिलांकडे आले. प्रमोद आपल्या बाळगोपाळांचा मेळा घेऊन खेळायला निघाला होता. इतक्यांत त्याला ते लेखक आल्याचें कळलें. लगेच धावत जाऊन त्यानें लेखकमहाशयांच्या पाठीवर आपल्या चिमुकल्या हातानें शाबासकी दिली आणि म्हटलें, "तुम्हीं गोष्ट मोठ्या चटकदार भाषेंत लिहिलीत बुवा!" इतका छोटा रसिक अगदीं बरोबरीच्या नात्यानें अभिप्राय देईल ही कल्पनाही त्या लेखकांना नव्हती. तोंडांतील विडी काढून लेखक आश्चर्यानें प्रमोदकडे पाहात राहिले! प्रमोद लगेच निघून गेला आणि खिडकींतून जातां जातां आपल्या सोबत्यांना सांगूं लागला, "अरे ते पाहा प्रसिद्ध लेखक * * *"

चित्रपटाविषयीं प्रमोदच्या आवडीनिवडी ठरलेल्या आहेत. आपल्या वडिलांना तो नेहमीं सांगतो, "नाना तुमचे सिनेमा ठीक असतात म्हणा, पण अन्यांच्या सिनेमांत फार हसायला येतं. ते फार आवडतात बुवा आपल्याला!" पण केवळ कलेंतच नव्हे, तर जीवनांतही प्रमोद आपली चिकित्सक दृष्टी सदासर्वदा सूक्ष्मपणें चालवतो. आपल्या भोवतालच्या नातेवाईक दंपतींत विशेष सुखी कोण आहे, हें त्याला कळतें आणि त्या जोडप्यांना तोंड भरून धन्यवाद देण्यांत त्याला आनंद वाटतो.

कला आणि जीवन ह्यांची सांगड घालण्याचा प्रयत्न प्रमोदनें आपल्या वाङ्मय-कृतींत केला आहे! सहासात वर्षांच्या ह्या छोकऱ्यानें एक नाटक लिहिलें आहे. नाटक राजा, राणी, पऱ्या अशा थाटाचें आहे. यशस्वी नाटककाराप्रमाणें भोवतींची मंडळी डोळ्यांपुढें ठेवून त्यांना साजेशा भूमिका प्रमोदनें रेखाटल्या

आहेत. प्रमोदला जीं माणसें आवडतात त्यांच्याकडे सज्जन, पराक्रमी माणसांच्या भूमिका देण्यांत आल्या आहेत. प्रमोदला जीं माणसें आवडत नाहींत, त्यांना खलपुरुष व त्याची प्रभावळ ह्यांच्या भूमिका मिळाल्या आहेत. आपल्या वडिलांबद्दल प्रमोदला कांहींच निर्णय घेतां आला नाहीं. त्या अभिनयनिपुण नटाला आपल्या मुलाच्या नाटकांत भूमिका नाहीं! प्रमोद स्वतः नाटकांतला राजा म्हणजे नायक आहे आणि आपला विजय झाल्याचें नाटकाच्या शेवटीं प्रमोदनें दाखवलें आहे.

देव करो आणि जगाच्या रंगभूमीवरही आपल्या पसंतीप्रमाणें भूमिका वांटून देण्याचें व अखेर विजयी होण्याचें भाग्य प्रमोदला लाभो असें मी इच्छीत असतों.

★

# मीना



मीना आंगणांत खेळत होती. तिचा ‘ बाबू ’ [ तिच्या बाहुल्याचें नांव ] तिच्याजवळच होता. त्याला उद्देशून ती गाणीं म्हणत होती. “ वाला फोफावला ” हें भावगीत ऐन रंगांत आलें. इतक्यांत भिवा गाडी घेऊन आला. त्याबरोबर गाणें बदललें. ‘ जिवाच मैतल तुम्हि माझ्या ’ ह्या ग्रामीण गीताला सुरुवात झाली. तेवढ्यांत संधिप्रकाशांत चंद्राची कोर मीनाला दिसली. ‘ नभांत लुकलुकली – चंद्‌लकोल इवली ’ ह्या गाण्याची लकेर सुरावर निघूं लागली. अखेर ‘ बाबू ’ निजला म्हणून म्हणा किंवा मीनाजवळचा गाण्यांचा संग्रह संपला म्हणून म्हणा हा संगीताचा कार्यक्रम आटपला !

भोवतालच्या वातावरणाला जुळेल असेंच गाणें हुडकून काढणारी ही छोकरी अवघी तीन वर्षांची आहे. पण तुम्ही तिला पांच वर्षांची सहज म्हणाल. कपड्यांची झकपक विशेष. जरीचे, वेलबुट्टीचे, रेशमाचे कपडे हवेत तिला. तिचा चेहेरा लहानखोरा आहे. पण आपलेंच म्हणणें चालविण्याचा ताठरपणा तिच्या

त्या गोजिरवाण्या चेहेऱ्यांत दिसतो. मीना मैत्री झटकन् करते, पण आपला गौरव झाला पाहिजे ह्या एका अटीवर. मला ती पहिल्यानेंच भेटली तेव्हांची गोष्ट. आमच्या वाड्यांतल्या लहान मुली ह्या चिमुकल्या बालाकडे मोठ्या उत्कण्ठतेनें पाहात होत्या. मीना पहिल्यानें त्यांच्याशीं बोलायलाही तयार नव्हती. पण त्या मुलींत आपले भक्तगण मिळतील अशी खात्री दिसतांच मीनानें मौन सोडलें आणि त्यांच्यांत ती रमली.

मीनाचा लहानसा संसार आहे. तिनें तो दक्षतेनें वाढवला आहे. तिला तऱ्हेतऱ्हेच्या आकाराचीं भांडीं आवडतात. तिची शोधक दृष्टि नवे नवे जिन्नस हुडकून काढण्यांत दंग असते. अमूक एक जिन्नस आपल्या संसारांत नाहीं असें तिला आढळून आलें कीं ती आईच्या मागें भुंगा लावील, "आई, तें घेऊन दे कीं." पण संसार केवळ स्वतःसाठीं नाहीं ह्याचीही जाणीव तिला आहे. मीना आदरातिथ्यांत मोठी कुशल आहे. आईच्या मैत्रिणी बसायला आल्या कीं आपला चिमुकला कपबशांचा सेट ट्रेमध्यें घेऊन मीना येईल आणि त्या मैत्रिणींना परोपरीनें आग्रह करील,

"घ्या ना चहा अक्का, मांजल पील, माछा पलतील." असा हा गोड आग्रह कोण डावलूं शकेल ?

इतकी दक्ष आणि आतिथ्यशील 'गृहिणी' मूलवेडी नसली तरच नवल ! मीनाला 'बाबू' म्हणजे परब्रह्म वाटतें. स्वतःचीं सारीं गूजें त्याच्या कानांत सांगितलीं म्हणजे तिचें बाळमन हलकें होतें. वर जायचें असलें तरी मीना 'बाबू' च्या कानांत सांगेल "बाबू" वल जाऊन येतें अं." पण आपण त्याला जीव कीं प्राण करतों एवढ्यानें तिचें समाधान होत नाहीं. तो [ निर्जीव ] 'बाबू' हातपाय हलवीत आहे असें समजून तुम्हीं हसलें पाहिजे; त्याच्या चेहेऱ्यावर वेगवेगळे भाव उमटत आहेत, ह्या मीनाच्या सांगण्यावर विश्वास ठेवून तुम्हीं त्याप्रमाणें बोललें पाहिजे; तुम्हीं त्याला चुचकारलें पाहिजे; तुम्हीं त्याचा पापा घेतला पाहिजे. इतकें झालें तरच मीनाच्या दप्तरांत तुमची 'मनुष्य' म्हणून नोंद केली जाईल.

'बाबू' च्या खालोखाल इतर 'मानवी' मुलांवर मीना प्रेम करते. गेल्या वर्षीं ती महाबळेश्वरला गेली होती; तेव्हां तेथें भेटलेला पांच सहा महिन्यांचा टोमॅटोसारखा 'कल्टू' तिच्या लक्षांत आहे. "कल्टू कल्टू कोंबडीचं पिल्लूं" असें म्हणत ती ब्रह्मानंदानें टाळ्या पिटीत असे. "आई, आपन ते पानी होतं, होली

होती, तिकडे कधीं जायचं ?" असें आईला मीना विचारते. महाबळेश्वरच्या रमणीय तलावांत केलेला जलविहार तिला आठवतो. पण त्या प्रदेशाशीं 'कलू' चा संबंध आला म्हणून मीनानें आपल्या हृदयांत तो देखावा कोरून ठेवलेला दिसतो. 'नभांत लुकलुकली' हे शब्द फिरवून 'नभांत कलुकलुली' असें मीना करते आणि आपल्या बालमित्राच्या गोड आठवणींत मग्न होते.

मीनाची आई प्रसिद्ध लेखिका आहे. आपला चिमुकला हात आईच्या पाठीवर मारून 'शाबास' आई छान लिहिलीस गोष्ट' असें मीना म्हणते. ह्या बक्षिसापुढें आईला 'नोबेल प्राईझ' ची काय मातब्बरी वाटेल ? पण आई फार लेखनांत गुंतलेली पाहिली म्हणजे मात्र तेव्हां मीना उद्गारते, "आई, तुझा मला कंटाळा आला." खुद्द मीनाला एकच गोष्ट येते. "एक होतं गांव. तिथं होतं पोष्ट, झाली आमची गोष्ट !" ह्याहून लघुतम कथा जगांत असेल का दुसरी !

मीनाला फुलांचा फार ध्यास आहे. फुलानें फुलाचा ध्यास घ्यावा तसेंच नाहीं का हें ? पण देव सुद्धा देवाची आराधना करतांना दिसतात. शंकराची रामावरील भक्ति कोणास माहीत नाहीं ? मीनाला चोहींकडे फुलें पाहिजेत. फ्रॉकवर, चड्डीवर, अभ्र्यावर चोहींकडे फुलेंच फुलें असलीं पाहिजेत. कोणीं फुलें वापरलीं नाहींत तर मीनाला कसेंसेंच होतें. एकदा अभ्र्यावरचीं फुलें मीना उसकटत होती. काकूंनीं विचारलें, "काय करते आहेस मीना ?" मीनानें म्हटलें, "तुम्ही बागेंतलीं फुलं घालीत नाहीं, म्हणून हीं देतें काढून तुम्हांला." काकू कां फुलें घालीत नाहींत हें बिचाऱ्या मीनाला काय कळणार ? जगांत कोणी फुलांशिवाय राहूं नये अशी मीनाची मंगल मनीषा किती कौतुकास्पद आहे !

★

# चंदू



“ जिंदगी है एक् प्यार – लला ला ला लाऽल् लाऽल् ” असे विचित्र बोल ‘ शिकंदर ’ चित्रपटांतील लष्करी गीताच्या तालसुरावर म्हटलेले ऐकूं येतात. इतक्यांत दारावर थाप ऐकूं येते. मी हातांतील पुस्तक बाजूला ठेवून हसत हसत दार उघडतों. दारांत एक चारपांच वर्षांची मूर्ति दिसते ! डोक्याला उंच तांबडी फरकॅप, जरा तिरकीच बसवलेली, पायांत पठाणी वहाणा, लांड्या विजारीच्या पट्ट्यांत एखादी काठी तलवारीसारखी खोवून दिलेली, हातपाय धुळीनें माखलेले, चेहेऱ्यावर उसनी नव्हे तर खरीच लष्करी ऐट. नेपाळच्या पहाडी मुलखांतून एखादा भीमसमशेरजंग किंवा जुद्धसमशेरजंग तर बालरूप घेऊन खालीं उतरला नाहीं ना असा भास व्हावा ! प्रस्तावना न करतांना हा बालगुरखा पहिला प्रश्न विचारतो,

" खोकीं आहेत का ? "

" नाहींत. "

" मग काड्याच्या पेट्या ? "

" त्याही नाहींत. "

" सिगारेटच्या डब्या ? "

" नाहींत. मी कधीं सिगारेट ओढतो का ? नाहीं ना ? मग कुठल्या सिगारेटच्या डब्या ? "

" बरं. मग खोकं रिकामं झालं एखादं तर ठेवा माझ्यासाठीं. " इतकें बोलून पुनः स्वारी चालूं लागते — ' जिन्दगी है एक प्यार् ... '

ह्या माझ्या छोट्या मित्राचें नांव चंदू. चेहेरा वाटोळा गरगरीत, कान मोठे, वर्ण तजेलदार, नाक जरा लवकरच संपलेलें, डोळे सुंदर. पण ह्या सर्वांपेक्षां चटकन् डोळ्यांत भरणारी गोष्ट म्हणजे त्याच्या मुद्रेवरील मनमोकळेपणा. अनेक गृहरत्नांशीं मीं मैत्री जोडली आहे, पण चंदूइतकें धीट आणि मनांत कोठलीही खळबळ नसलेलें पोर माझ्या पाहाण्यांत नाहीं. भीति किंवा आदर ह्यांपैकीं कसलाच विकार त्याच्या चेहेऱ्यावर नसतो. आडवळणानें एखादी गोष्ट काढून घ्यावी, मोठ्याशीं मोठ्याप्रमाणें वागावें, काम साधण्यासाठीं कृत्रिम गोड बोलावें, ह्या गोष्टी त्याला जमतच नाहींत. मी कधीं त्याला गमतीनें " काय मिस्टर बिनडोक् ! " असें हाकारलें कीं लगेच चंदू उलट संबोधून म्हणतो, " काय तळघर ! " कोणाचा मुलाहिजा तो सहसा ठेवीत नाहीं. मावशीला तो त्यांतल्या त्यांत वचकून असतो. तरी पण, ' तुझ्या घरांतले लाडू मी हळूच घेणार आहें. ' असें मावशीनें म्हणतांच तो किंचित् विचार करून म्हणतो, " कसे घेणार ? चोरून ? " आणि मावशीनें " हो ! चोरून. " असें उत्तर देतांच स्वारी उसळून म्हणते, " तुरुंगांत टाकीन तुम्हांला. " पण ह्यांत उद्दाम अपमान करण्याची वृत्ति नाहीं. ' अरे तर का रे ' हा न्याय त्याच्या रक्तांतच भिनलेला आहे.

ह्यामुळेंच कीं काय नेहमीं तो युद्धाच्या वातावरणांत रंगलेला असतो. ' शिकंदर ' हा चित्रपट त्याच्या जीवनांत सारखा सुरू आहे. बंदूक, तोफा, पुष्पबाण, बॉंबस् ह्यांच्या नेहमीं गोष्टी ! त्याचा त्याच्याच वयाचा नाना म्हणून स्नेही आहे. नाना मोठा विनोदी दिसतो. चंदू आणि नाना दुपारच्या वेळीं

बंगल्याच्या भोवतीं धनुष्यबाण घेऊन भटकत असतात. चंदूला लढाईच्या वार्ता अगदीं आजतागायत माहीत असतात. " अरे नाना, कलकत्ता खालीं झालं. निम्मे लोक पळाले. तिथं कापड फार स्वस्त झालंय्. " अशा बातम्या चंदूराव मोठ्या तज्ज्ञाचा आव आणून सांगत असतात. नाना भाविकपणें त्या ऐकत असतो. एखादे वेळीं नाना मध्येंच विचारतो, " काय रे, कलकत्यांतले लोक कुठं गेले रे पळून ? " चंदूराव थोडा वेळ विचार करून शिष्याचें शंकानिरसन करतात, " अरे, मुंबईला आले आहेत. " पण श्रीयुत नानारावही थोडे जाणकार आहेतच. ते लगेच विचारतात, " पण काय रे चंदू, मुंबईचे सुद्धा लोक पळाले ना ? तूंच म्हणालास ना काल ? ते कुठें गेले ? " " अरे, ते आले पुण्याला. " युद्धजन्य परिस्थितीविषयींची त्यांची ही चर्चा मोठी ऐकण्यासारखी असते. वर्तमानपत्रांतले ठळक ठशांतले मथळे वाचून किंवा मोठ्या माणसांच्या चर्चा ऐकून चंदू सर्व माहिती जमवतो.

जपान्यांवर चंदूचा फार रोष आहे. " जपानी आले तर त्यांना गोळी घालीन " असें तो म्हणतो. " आज मीं चार जपानी मारले " असें वृत्त मोठ्या विजयश्रीची मुद्रा करून तो कधीं कधीं सांगतो. " जपान्यांनीं बॉंब टाकले तर तूं काय करशील ? " असें मीं त्याला एकदा विचारलें तर त्यानें लगेच उत्तर दिलें, " परत त्यांच्या विमानांत ते टाकून देईन. " किती सोपा उपाय ! हिंदुस्थान सरकारनें ह्या गट्टी राष्ट्रांच्या विरोधकाला संरक्षण समितीवर नेमणें जरूर नाहीं का ? निदान हवाई हल्ल्याच्या प्रतिबंधासाठीं तरी चंदूमहाशयांना एखादी बडी नोकरी सरकारनें द्यावी.

कोठलीही भीडभाड, कपट हे भावच चंदूच्या मनांत नाहींत. त्यामुळें चोरी सुद्धा तो उघडपणें करतो. एकदा आमच्या घरांत त्याला एक रुपया सांपडला. लगेच आपल्या चिमुकल्या हातानें माझ्यापुढें तो रुपया धरून मला तो म्हणाला, " अहो, हा तुमचा रुपया आम्ही चोरणार आहोंत बरं का ? " अर्थात् मी मागतांच तो रुपया मला परत मिळाला हें सांगणें नकोच. स्वार्थाची भावना उदात्त शब्दांच्या आवरणानें झाकून ठेवणें चंदूला जमत नाहीं. एकदा थोडेंसें खोबरें आणून त्यानें मावशीच्या हातावर ठेवलें आणि तो म्हणाला, " अहो, तुम्ही आम्हांला खोकीं वगैरे देतां ना, म्हणून तुम्हांला हें खोबरें घ्या. " एकदा आमच्या घरीं चहा घेतांना चंदूराव बोलले, " परवां तुम्हीं आमच्याकडे कॉफी घेतली ना ? म्हणून मी आज तुमच्याकडे चहा घेतों. "

भाषेच्या बाबतींत त्याची स्वतंत्र शैली आहे. एकदा मी बॅग भरीत होतों. ह्यानें विचारलें, "काय हो, तुम्ही कुणाला चाललांत?" येथें कुणाला म्हणजे कोणत्या गांवाला!

रस्त्यावरून माकडवाला चालला असला तर चंदू अधीरपणें वडिलांना म्हणतो, "नाना, माकडाचा खेळ होऊं दे का?"

"वाजकं इंजिन गेलं" असें तो सांगतो, तेव्हां त्याचा अर्थ एवढाच असतो कीं जातां जातां इंजिनानें शिटी वाजवली.

असा हा चंदू आहे. त्याला कोणाबद्दल आदर नाहीं. पण कोणाबद्दल फारसा द्वेषही नाहीं. पहिल्यानें तो धटिंगण वाटतो, पण त्याच्या धटिंगणपणालाही शिस्त आहे. पठारावर वाढलेल्या एखाद्या सडेसोट झाडासारखा तो आहे. त्याचे गुण जाणणारांकडे तो स्वतः ओढला जातो हें खरें. आपल्या चाहत्यांशीं हळुवारपणें वागणें त्याला साधायचें नाहीं; पण त्याच्या त्या निर्मळ व उच्छृंखल मनाचें आकर्षण ज्याला वाटेल तो चंदूचा कोठलाही धटिंगणपणा माफ करील.

★



# केतकी

सायंकाळ संपली होती. डोंगराच्या सौधावर पडलेल्या संधिप्रकाशानें काळोखाचें पांघरूण आतां अगदीं डोळ्यांपर्यंत ओढून घेतलें. एखादी चांदणी धीट होऊन चमकूं लागली. रानांतून परतलेल्या पक्ष्यांची किलबिल अंतराळीं ऐकूं येई, पण त्यांचें नीट दर्शन मात्र होईना. अशा वेळीं आमच्या बंगल्याच्या फाटकाशीं एक टांगा उभा राहिला. मी जरा पुढें होऊन पाहातों, तों एक लहानशी बालिका खालीं उतरली. एखाद्या सुगृहिणीनें कौशल्यानें विणलेलें ग्लॅक्सोचें बाळच सजीव होऊन आलें आहे असें क्षणभर मला वाटलें. खेळांतली कचकड्याची बाहुली रात्रीं घरभर खेळायला लागली अशा वर्णनाच्या कितीतरी काल्पनिक गोष्टी मीं माझ्या बालमित्रांना आजवर सांगितल्या होत्या; पण आज त्यांतली एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडत आहे असें वाटलें.. लांडग्याला भिऊन ही कोणी 'रेड रायडिंग हूड' तर नाहीं ना आंत आली असाही भास क्षणभर झाला. लहानशी, फुगलेल्या पुरीसारखी, चेहेऱ्यावरून शांत दिसणारी अशी ती बालिका पाहून मला फार मौज वाटली. तिच्यामागें एक वृद्ध गृहस्थ होते, त्यांच्याशीं ती कांहीं तरी बोलत होती. तिच्या हातांत एक बाहुली होती आणि दोन फुगे होते. त्यासंबंधींच कांहीं हकीगत ती आपल्या आजोबांना सांगत असावी. भविष्यकाळ भूतकाळाशीं गुजगोष्टी करीत आहे असें त्या दृश्याचें वर्णन थोडक्यांत करतां आलें असतें.

मीं चटकन् जाऊन त्या बालिकेला उचललें. त्याबरोबर किंचित् रागीट चेहेऱ्यानें ती माझ्याकडे पाहूं लागली. तिच्या डोळ्यांत भेदरटपणा नव्हता, पण नाखुषी होती.

" कोण हा माणूस ? ओळखदेख नसतांना आपणाला कां उचलून घेत आहे ?" असे प्रश्न रुसव्यामुळें अधिकच फुगीर झालेल्या तिच्या चेहेऱ्यावर दिसत होते.

" काय नांव तुझं ?" मीं हसत विचारलें.

ती आजोबांकडे पाहूं लागली. आजोबांनीं सांगितलें, " सांग ना तुझं नांव त्यांना." आतां हा माणूस मित्रपक्षापैकीं आहे असें तिला वाटूं लागलें. अर्धबोबड्या शब्दांत ती म्हणाली, " यता जांभेकल. छा बुधवाल, काकाकुवा पेन्शन [ मॅन्शन ]."

लतेशीं लवकरच माझी खूप गट्टी जुळली. तिचे वडील आणि मी शेजारीं आहोंत, पण लता आपल्या घरीं सर्वकाळ राहात नाहीं. वर तिनें सांगितला तो पत्ता तिच्या आजोबांचा. हिंदुस्थानांतील कांहीं हौशी श्रीमंत जसे विलायतेंत वर्षाच्या कांठीं सात आठ महिने राहातात आणि मोठ्या मेहेरबानीनें ३-४ महिने स्वदेशीं येतात तसें लताचें आहे ! दररोज आजोळाहून स्वारी घरीं येते ती कांहीं तास घालविण्याकरितां. पण घरीं आली तरी जाण्याचा वेध सारखा असतो. तिला आणून पोचविणें आणि घरीं परत घेऊन जाणें, हा आजोबांच्या दिनचर्येंतला एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे.

रात्रीं जेवण करून मी पलंगावर जरा आडवा होतों तों " नानूशाहेऽब " असा पुकारा होतो. " आल्या लताबाई " म्हणून हसत हसत मी दार उघडतों. आंत येतांक्षणींच प्रस्तावना वगैरे न करतां दिवसांत घडलेल्या हकीगतींचें निवेदन लता सुरू करते.

" आमच्याकडे शीखंड केलं होतं. मीं निळा फुगा आणला. इंदूमावशी मला माकड म्हन्ते..." अशा नानाविध गोष्टी असतात ! नवीं खेळणीं किंवा कपडे आणले असले तर ते सर्व दाखवायचे; पण लगेच त्या सर्व वस्तु घरांत नेऊन ठेवण्याची तत्परता फार ! न जाणों कोणाला मोह पडला आणि त्यांनीं त्यांतल्या कांहीं ठेवून घेतल्या तर काय करतां !

लता मराठी भाषा बंगाली पद्धतीनें बोलते. सारे उच्चार गोल गोल असायचे ! माझ्याकडील मासिकांत एक चित्र तिनें पाहिलें. चहाची जाहिरात होती ती.

लतानें विचारलें, " हे कोण ?" मीं सांगितलें, " ही विमल कुमारी चहा पीत आहे." दुसऱ्या दिवशीं तें चित्र दिसतांच लता म्हणाली, " विमल कोमाली शॉ पिते." पण आपण जर तिच्या उच्चारपद्धतीनें अनुकरण करून म्हटलें, " लता, शॉ पिऊं का मी ?" तर लगेच आपणांला दटावून ती म्हणेल, " शॉ नाहीं शहा. नीट म्हणा कीं."

आपले मामा आणि मावश्या आपलें जें वर्णन करतात तें निःसंकोचपणें लता सांगते.

" तुझं नाक कसं आहे ?"

" चपटं "

" तुझं तोंड कसं आहे ?"

" माकडासारखं."

" तुला काय म्हणतात ?"

" ढोल्या."

पण हें संभाषण लता खुषींत असेल तरच होईल. तिची वृत्ति जरा गंभीर असल्यास ती आपणावरून तुम्हांला विनोद करूं देणार नाहीं. अशा वेळीं " काय ढोल्या ? काय माकड ?" अशी तिला हाक मारा, कीं लगेच करारी आवाजांत थोडें कावल्यासारखें करून ती बजावील,

" यता–यता."

" हें तुम्ही काय म्हणतां ? माझं नांव लता आहे हें तुम्हांला माहीत नाहीं का ?" असें सांगण्याचा तिचा हेतु असतो.

'अम्बुत' (अमृत) हा एकच सिनेमा चोहींकडे लागलेला असतो अशी लताची समजूत आहे. सिनेमा म्हणजे " अम्बुत." तिला तऱ्हतऱ्हेच्या कपड्यांची खूप आवड आहे. आतां तिला विजार आणि शर्ट कधीं कधीं घालतात. तो पोषाख तिला फार आवडतो आणि दिसतोही सुंदर. पोषाखावरून माणसाचें मनच नव्हे तर शरीरसुद्धा बदलतें अशी लताची श्रद्धा आहे. कारण अलीकडे लता म्हणत असते, " आतां शल्ट नि विजार घालतें ना मी ? आतां मी मुग्गा [ मुलगा ] होणार."

★

# गोविंद आणि गोपाळ



अगदीं लहानपणीं आम्हांला एक काव्यपंक्ति पाठ येत असे :

" गोविंद गोपाळ हे दोघे बंधू "

ह्या बंधूंचे पराक्रम काय होते, कशाकरितां ही जोडी प्रसिद्ध आहे, हें मात्र ठाऊक नव्हतें. पण ह्या नांवांनींच दोन भावंडें पाहाण्याचा अलीकडे योग आल्यामुळें मला ही काव्यपंक्ति पुनः आठवूं लागते.

माझ्या कचेरीला जायला सकाळीं ८॥–९ च्या सुमारास मी निघतों. टिळकरोडवरून पर्वतीला जायला रस्ता फुटतो तेथें आमच्या डॉक्टरांचा बंगला आहे. बंगल्याच्या लतावेष्टित कुंपणाजवळ सहा सात वर्षांचीं दोन भावंडें खेळतांना दिसतात. अगदीं सारख्या आकाराचीं व सारख्या चेहेऱ्याचीं आणि त्यांचे पोषाखही अगदीं सारखे असतात. ह्याची निळी चड्डी तर त्याचीही तशीच. एकानें सुरवार चढविली असेल तर दुसऱ्याची सुरवारच असणार. मोठाले डोळे, गोल तोंडें, सतेज श्यामल वर्ण आणि मध्यम बाळसें अशा वर्णनाची ही जोडी आहे. एकाच क्षणीं जगामध्यें हीं दोन जीवनपुष्पें उमललीं. एकाचें नांव गोविंद व दुसऱ्याचें गोपाळ.

पटदीप व भीमपलास हे दोन राग तुम्हांला माहीत असतील. किती साम्य असतें त्यांत. साध्या माणसाची तर फसगत होते. गोविंद आणि गोपाळ ह्यांच्यांतलें साम्य इतकें बेमालूम आहे.

मोठी गंमत होते. आज सकाळीं गोपाळ मला कांहीं गमतीदार शब्द बोलून जातो. "कांहो, आज काळी टोपी कां?" दुसऱ्या दिवशीं पांढरी टोपी डोक्यावर चढवून आलों असतां गोपाळ समजून गोविंदालाच मी म्हणतों, "काय रे! आज आहे ना पांढरी टोपी?" तो निर्विकार चेहेरा करून पाहूं लागतो. कारण माझा उल्लेख त्याला कळत नाहीं! मग पलीकडे असलेला खरा गोपाळ धावत धावत येतो आणि म्हणतो, "आहे बुवा! आज पांढरी टोपी." आणि नंतर माझ्या लक्षांत येतें कीं माझ्या पेहेरावाचें ज्यानें सूक्ष्म निरीक्षण केलें तो हा बाल चिकित्सक!

ह्या जोडीच्या हातांत कांहींतरी आयुधें हीं असायचींच. 'फाकड्या तलवार बहाद्दरां' प्रमाणें कशावर तरी तीं उगारलेलीं असतात! लांबून पाहावें तों एखादी गाडी, बैल, लष्करी मोटर, कशावर तरी हातांतलें आयुध रोखून गोविंद उभा आहे आणि गोपाळ त्याच्या अनुकरणानें तसेंच करण्याच्या तयारींत आहे!! हा नेहमींचा देखावा असतो.

ह्या दोघांचें बोलणें सूत्रबद्ध असतें. माझ्याबरोबर सकाळीं आमचे हजरत बहुधा असतात. त्यांच्या हातांत दिवसांतल्या १२ तास छत्री ही असतेच! एक दिवस ते अगोदर फिरून गेले. माझ्या वेळेवर मी डॉक्टरांच्या बंगल्यावरून चाललों होतों. तेव्हां गोविंद कीं गोपाळ [ मला ओळखतां येत नाहीं अजून ] म्हणाला, "अहो! ते छत्री घेऊन गेले मघाशीं."

सकाळच्या प्रहरीं पाऊस नसतांना छत्री हातांत असणें ह्याचें आश्चर्य स्वारीला वाटलें होतें. शिवाय हजरतांबरोबर मी नाहीं ह्याचाही अचंबा वाटला होता. तेव्हां ह्या व अशा कल्पनांचा गठ्ठा करून आणि मलाही माझ्या मित्राची एक वार्ता सांगून उपकृत करतां आलें तर पाहावें म्हणून स्वारीनें वरील सूत्रमय वाक्य उच्चारलें असावें!

पण ह्या दोन आवळ्या जावळ्या व्यक्ति वाऱ्यापेक्षां चंचल आणि सृष्टीपेक्षां लहरी आहेत! त्यांची मौज दाखविण्याचें कुणा मित्राला आश्वासन देऊन जर तेथें नेलें

तर फजिती होण्याचा संभव फार ! कारण माझ्यासारख्या चिरपरिचित माणसाकडे सुद्धा थंड व ओळख नसल्यासारखे चेहेरे करून पाहात ते कधीं कधीं उभे राहातात. प्रश्नांचीं उत्तरें देत नाहींत. एखाद्या फासेपारध्याकडे ज्या तिऱ्हाईत दृष्टीनें आपण पाहूं तसे पाहात पाहात ते निघून जातात !

त्यांचें स्वतःचें स्वतंत्र जग आहे. त्यांचे कांहीं विचार चाललेले असतात. तुम्ही त्यांच्याजवळ गेलांत तर जणूं आपल्याला त्या जगाची पूर्ण कल्पना आहे, आपले अनुभव ह्यांना पूर्ण माहीत आहेत अशा कल्पनेनें ते तुमच्याशीं बोलूं पाहातात. एकदा मी त्यांच्याजवळ पोचतों तों समोरून एक बस येत होती. तेव्हां ह्या व्यक्तींतली एक व्यक्ति हसून मला म्हणाली, " अहो, बरी झाली ही बस बरं का ! " आदल्या दिवशीं ती बस नादुरुस्त झाल्याचें ह्या व्यक्तीनें पाहिलें असेल आणि मलाही तें ठाऊक असेल अशा कल्पनेनें, माझ्या निदर्शनाला ही गोष्ट त्यानें आणली असा मीं तर्क केला आणि शोध करतां तो खरा ठरला.

आमच्या हजरतचें ' साठे ' असें नांव ह्या दोघांनीं ठेवून दिलें ! कां कोणास ठाऊक, एके दिवशीं आम्ही दोघे चाललों असतांना हजरतचा कोट ओढून एकजण म्हणाला, " अहो साठे ! " आम्ही खो खो हसूं लागलों ! हजरतचें नामकरण ह्या दोन वल्लींनीं असें कां केलें ह्याचा मग मीं तपास केला. तेव्हां असें दिसून आलें कीं हजरत ज्या गल्लींतून येतांना ह्या वल्लींना दिसतात तिच्या कोपऱ्यावर साठे ह्यांचा बंगला आहे. तेव्हां त्याच बंगल्यांतून हे गृहस्थ येत असावेत असा तर्क करून यांनीं बंगल्याच्या मालकाचें नांव हजरतच्या माथीं मारलें.

जें काम तुम्ही त्यांच्यासमोर कराल त्याबद्दल ते तुम्हांला सदैव विचारीत राहातील. पुनः कांहीं नवीन कराल तेव्हां नवा प्रश्न ! एकदा डॉक्टर बंगल्यांत नव्हते म्हणून मीं चिठ्ठी ठेवली. त्यानंतर दररोज ही जोडी मला विचारीत असे कीं ' कां हो, आज चिठ्ठी नाहीं का ठेवायची ? ' नंतर पुनः शेजारच्या दुकानांत मी शिरलों तेव्हां हा प्रश्न मागें पडला आणि " कां हो, आज दुकानांत नाहीं का शिरलां ? " अशी विचारणा सुरू झाली !

अशीं हीं मोठीं मजेदार भावंडें आहेत. शाळेंत मोठ्या समारंभानें त्यांना घातलें, पण आठवड्यांतून सहा रविवार समजण्याची पद्धति त्यांनीं पाडली ! आतां मात्र थोडी फार प्रगति झाली आहे ! शिवाय दोघांच्या स्वरूपांतही किंचित् वेगळेपण दिसत आहे. ह्यांतला एक जरा जास्त आक्रमक वाटतो आणि दुसऱ्याला

याचे हुकूम ऐकण्यांत धन्यता वाटत असावी असें दिसतें. जिवंत आणि निर्मळ असे हे दोन चिमुकले धबधबे आहेत. त्यांच्या विलासांत तुम्हीं जुळवून घेतलेंत तर तुम्हांला ते संतोष देतील. पण तुमची पर्वा ते कधींच करणार नाहींत आणि तुमची खुशामत करण्याची तर त्यांना गरजच वाटणार नाहीं. सकाळीं जीवनकलहाला आरंभ करतांना ह्या दोन चिमण्या जलप्रपातांचें दर्शन झालें कीं मला नवा हुरूप येतो आणि रात्रीं निजतांना उद्यां सकाळीं हे दोघे कोणत्या पवित्र्यांत दिसतील, काय बोलतील व कोणत्या गमती करतील ह्याचा विचार करीत मी झोपीं जातों.

★

# नंदू



'हा पाहा आमचा नंदू' असें म्हणत आमच्या मित्रांनीं जेव्हां नंदूला माझ्यापुढें केलें तेव्हां नंदू भेदरलेल्या पण थोड्या रागीट नजरेनें पाहात होता. गोरा पान, पिंगट व तेजस्वी डोळ्यांचा नंदू आपल्या वडिलांना अधिकच बिलगून बसला. ब्लेक कवीनें वाघावर कविता लिहितांना असे आश्चर्योद्गार काढले आहेत कीं, "ज्यानें कोकरूं उत्पन्न केलें त्यानेंच तुझी घडण केली ना?" मग कोकराचा गोजिरवाणेपणा आणि वाघाची तेजस्विता ज्यांत एकवटली आहे अशा आमच्या नंदूला पाहून ब्लेक काय म्हणाला असता कोणाला ठाऊक?

नंदूची माझ्याशीं सलगी एकदम वाढली नाहीं. हळूहळू तो धीट होत गेला. प्रथम प्रथम मी गेलों कीं माझ्यासंबंधीं मला ऐकूं जाईल इतपत अंतर्गृहांत

तो बोलायचा, "हें गोपीनाथकाकांना दाखवूं का ?" "त्यांना चहा द्यायचा का ?" अशीं कांहीं वाक्यें कानांवर येत. पुढें घरांत आणलेलें एखादें नवें खेळणें किंवा वस्तु माझ्यापुढें ठेवून पळायचा आणि दाराआड माझ्या मताचा अंदाज घेण्यासाठीं उभा राहायचा. नंतर सुरेख पोषाख वगैरे आणलेला असला कीं तो घालून त्यानें माझ्यापुढें उभें राहावें आणि खालीं मान घालून विचारावें, "चांगला आहे ?" आणि "हो ! हो ! हें काय विचारतोस ! छान दिसतो हा पोषाख तुला !" असें मीं म्हटलें कीं हर्षभरित होऊन तो आंत जायचा.

नंदोपंतांची कल्पनाशक्ति फार प्रबळ आहे. आम्ही एकदा सर्वजण सिंहगडला जायला निघालों. नंदूच्या घरांतील सर्व मंडळी येणार होती. येणार नव्हती त्याची एक धाकटी आत्या. ऐन वेळीं निकडीचें काम निघाल्यामुळें तिला घरीं राहावें लागणार होतें. तेव्हां तिची समजूत काढण्याच्या उदार बुद्धीनें नंदू सांगूं लागला, "तूं कांहीं वाईट वाटून घेऊं नको. सिंहगड आभाळाला टेकला आहे. मी वर गेलों कीं एक इंद्रधनुष्याचा तुकडा तुझ्या पोलक्यासाठीं कापून आणीन." नंदूचा मोठेपणाचा आव आणि कल्पकता ह्यांमुळें सर्वांनाच हसूं कोसळलें !

पण कविकल्पनेंत रमणारे हे गृहस्थ कित्येकदा वास्तववादी होतात. एकदा घरांतल्या सर्व मंडळीबरोबर नंदू सिनेमाला गेला होता. चित्रपटांत नायिकेचें काम नंदूच्या आत्यानें केलें होतें. चित्रपटाच्या शेवटीं हताश झालेली नायिका डोंगरावरून उडी टाकून आत्महत्या करते असा देखावा आला. चित्रपटांत देखील आपल्या प्रिय व्यक्तीचा असा शेवट पाहाण्याची घरच्या हळुवार मनाच्या मंडळीची तयारी नव्हती ! अभिनेत्रीची मातापितरें तर रडूं लागलीं ! नंदोपंत गंभीरपणें सर्वांचें सांत्वन करीत म्हणूं लागले, "अहो, रडतां कां ? हें चित्र आहे ! सुमनआत्या घरीं आहे ना ?"

अलीकडे शाळेंत क्रमिक पुस्तकांत कोणाचे धडे, कोणाचीं चरित्रें आलीं तर त्यावर विचार करून घरीं चर्चा करायची असा नंदूचा क्रम असतो. एकदा घरीं येऊन सर्वांना नवी बातमी म्हणून उत्साहानें तो सांगूं लागला, "आपले गोपीनाथकाका खूप मोठे लेखक आहेत, तुम्हांला ठाऊक आहे ?" आणि नंतर कोट काढतांना आठवल्यासारखें करून म्हणाला, "हो ! जवाहरलाल नेहरू सुद्धा लिहितात."

असा हा नंदू मोठा भाग्यवान आहे. आईवडिलांचा तर तो आवडता आहेच; पण दुधापेक्षां सायीवर प्रेम अधिक असतें ह्या न्यायानें आजाआजी

त्याला डोळ्यांतील बाहुलीप्रमाणें जपतात आणि विशेष भाग्याची गोष्ट म्हणजे त्याच्या विशाललोचना. पांच आत्या त्याच्यावर अखंड प्रेमाची वृष्टि करीत असतात. नुकतीच रासक्रीडा विसर्जन करून आलेल्या गोपांगनांप्रमाणें दिसतात त्या. त्यांतली कोणी आपल्या मधुर गाण्यानें नंदूला रिझवील, तर कोणी सुंदर कपड्यांनीं त्याला सजवील. कोणी त्याच्याशीं मार्मिक संभाषण करून त्याच्या कल्पकतेला फुलवील, तर कोणी तो संतापला असतां युक्तिप्रयुक्तीनें त्याला ताळ्यावर आणील. लहान आत्या तर त्याच्यासारखीच पोर बनून त्याच्या खोड्या काढील! ह्या गोकुळाजवळून जातांना तिऱ्हाईत रसिकाला "**नातें, स्नेह, निदान ओळख जरी येथें मला आणिती**" असें वाटल्यास नवल नाहीं. मी ह्या स्वर्गीय दृश्याच्या मध्यभागीं केव्हांही हक्कानें जाऊं शकतों ह्याचा मला नेहमींच साभिमान आनंद वाटतो.

वाचनालय शाखा
अनुक्रमांक ९८०५२
विभाग ...
क्रमांक ८९१०
नों. दि. २०।८।७५

★




एखाद्या चित्रकाराला अरुणचें विनोदी चित्र काढायचें झालें तर तो बहुधा वर्तुळें आणि अर्धवर्तुळें हींच अधिक वापरील. चेहेरा गोलाकार, दोन गाल चेंडूंसारखे, हनुवटी गोटीवजा, जिवणीही जरा स्फुरण पावली कीं वाटोळी होणारी आणि ह्या सर्व गोलाईला महिरप घातलेली ती दाट कुरळ्या केसांचीं— म्हणजे जणूं काळ्या रेशमी लड्यांचीं—वर्तुळें नि अर्धवर्तुळें करून सोडलेलीं.

—आणि ह्या गमतीदार चेहेऱ्यावर कायमचा जो भाव दिसतो त्यावरून ह्याच्या मनालाही कोठें टोकें–कोपरे नाहींत हें स्वच्छ दिसतें. गोजिरवाणें गांभीर्य आणि निर्मळ मुजोरी ह्यांचा मोठा सुंदर मिलाफ अरुणच्या चेहेऱ्यावर पाहायला मिळतो. शब्दोच्चार स्पष्ट प्रौढासारखे आणि स्वर कोमल मुलासारखा; बोलण्यांतला रुबाब प्रौढासारखा आणि त्यांतली अजाणती कला मुलासारखी; थोडक्यांत म्हणजे सद्‌गृहस्थासारखा पण शिष्ट मात्र मुळींच नाहीं, असा हा आमचा अरुण आहे. त्याचें बोलणें प्रथम तुम्हांला तुटकपणाचें वाटेल, पण तितकेंच तें चित्ताकर्षक कां आहे ह्याचा जेव्हां शोध कराल, तेव्हां त्यांतील अकृत्रिमतेचें व सात्त्विकतेचें रहस्य तुम्हांला कळेल.

अरुणचा 'खंड्या' म्हणून एक दोस्त आहे. डॉन क्विक्झोटचा विचार आपल्याला सँको पांझाला दूर ठेवून जसा करतांच येणार नाहीं, श्रीकृष्णाचा जीवनपट अर्जुन वगळून जसा उजाड दिसेल, तसें अरुणची मैत्री जोडायची

म्हणजे ‘ खंड्या ’ ला तुम्हांला पत्करलेंच पाहिजे. अरुणचें व ‘ खंड्या ’ चें प्रेम तर अधिकच गुंतागुंतीचें आहे. ‘ खंड्या ’ त्याचा मित्र आहे, सल्लागार आहे आणि प्रतिस्पर्धीही आहे. गांधीजी–नेहरूंइतका ‘ खंड्या ’ जगविख्यात आहे अशी अरुणची कल्पना झालेली दिसते. कारण कोठल्याही नव्या माणसाशीं बोलतांना ‘ खंड्या ’ चा उल्लेख अरुण अशा झोकांत करतो कीं जणूं त्या माणसाला ‘ खंड्या ’ ची प्रसिद्धि आणि विशेषतः अरुणचा आणि ‘ खंड्या ’ चा स्नेह पूर्णपणें ठाऊक आहे ! मनुष्य म्हणजे ‘ खंड्या ’ ची माहिती असणारा प्राणी अशी व्याख्या अरुणनें आपल्या बाल–ज्ञानकोशांत करून ठेवलेली असल्यास न कळे !

आपल्या जीवननाटकांत ह्या आपल्या मित्राला अरुण नाना भूमिका करायला लावतो हें वर सांगितलेंच. अरुणच्या दोनतीन मुलाखतींतच ह्याचा तुम्हांला प्रत्यय येईल. ‘ सर्कशींत पंधरा हत्ती आहेत ’ अशी बातमी अरुण सांगूं लागला आणि तुम्हीं ‘ छट्, खोटं आहे ’ असें म्हटलेंत, तर अरुण खवळून वजनदार पुरावा देईल, ‘ वाः तुला काय कळतंय् ? खंड्या सांगतो, आहेत म्हणून. ’ दुसऱ्या एखाद्या वेळीं तुम्हीं अरुणला विचारलेंत, ‘ काय रे, अंधारांत जाशील का ग्राउंडवर ? ’ तर अरुण तात्काळ ‘ हो ’ उत्तर देईल आणि तुच्छतादर्शक स्मित करून म्हणेल, ‘ मी जाईन, पण खंड्या घरांत बसून राहील ; तो भित्रा आहे. ’ केव्हां कोणाची टोपी वाकडी आहे असें पाहून तुम्ही हसूं लागलां तर त्यांत भाग घेऊन अरुण म्हणेल, ‘ काल खंड्यानें अशीच घातली होती टोपी ! ’

जुन्या पिढींतील कडक माणसांप्रमाणें किंवा कांहीं कोंकणी ब्राह्मणांप्रमाणें आदरार्थी बहुवचन अरुणनें आपल्या भाषेंतून जवळ जवळ हद्दपार केलें आहे. अरुणच्या बोलण्यांत जो अधिकाराचा डौल व सफाई असते त्यामुळें मोठ्या माणसाशीं बोलतांना त्यानें वापरलेली एकवचनी भाषा फार मजेदार वाटते. एकदा घरांत पूजेचा समारंभ चालला होता. सर्वजण मंत्रपुष्प म्हणत होते. अरुणच्या वडिलांचे आणि माझे गुरुही ज्यांना पूज्य मानतात असे आमचे एक स्नेही मात्र स्तब्ध उभे होते. श्रीयुत अरुणरावांचें लक्ष त्यांच्याकडे गेलें. त्यांनीं लागलीच त्यांना विचारलें, “ काय रे, तुला नाहीं वाटतं म्हणतां येत ? ”

अरुणरावांच्या ह्या फटकळपणाचा नवा अनुभव तर तुम्हांला फार हसवून सोडील. आमच्या टिळक रोडवर एक शिखांचें हॉटेल आहे. तेथें अरुणचे वडील त्याला चहा प्यायला घेऊन गेले. चहा संपवून वडील पैसे देण्यासाठीं

दाराशीं थांबले, त्या वेळीं पैसे घ्यायला एक बाल-शीख बसला होता. शेजारीं दाढीवाला प्रौढ शीख उभा होता. त्याच्याकडे एक कटाक्ष फेकून अरुणनें बाल-शिखाच्या तुरळक वाढलेल्या दाढीकडे पाहून बाल-शिखाला म्हटलें, 'काय रे, दाढी नाहीं केलीस का ?' चहा पीत बसलेल्या लोकांना हसें अनिवार होऊन ठसका लागायची वेळ आली ! प्रौढ शिखाच्या लांब दाढीचें अरुणला इतकें आश्चर्य वाटलें नाहीं. कारण इतर माणसांहून त्याचें तें स्वतंत्र वैशिष्ट्य स्पष्ट उमटून दिसत होतें. 'दाढीवाला बुवा' ह्या सदरांत त्याला टाकायला अरुणला अडचण पडत नव्हती. पण त्या बाल-शिखाच्या गालावरचे तुरळक केस त्याला 'दाढीवाला' पदवी देण्याइतके विपुलही दिसेनात आणि दैनिक सफाई केल्याची स्वच्छताही अरुणच्या आधुनिक दृष्टीला आढळून येईना. अशा विचारांच्या गोंधळांत सापडून अरुणमहाराजांनीं त्या बाल-शिखाला वरील पृच्छा केली होती.

आपल्या सामर्थ्याविषयीं पुरेसा विश्वास असल्यामुळें म्हणा किंवा एकंदरच बेपर्वाई वृत्तीमुळें म्हणा, मुलांच्या अंगीं स्वाभाविकपणें दिसणारी कौतुक करून घेण्याची वृत्ति अरुणमध्यें मुळींच नाहीं. 'शैशवा' मध्येंच 'प्रौढत्व' जपत बसणारा हा अजब छोकरा आहे ! एका वत्सल गृहिणीच्या घरीं अरुण कांहीं दिवसांपूर्वीं सदासर्वदा असायचा. पण अलीकडे त्यानें त्या घरावर एकाएकीं बहिष्कार घातल्याचें अरुणच्या वडिलांना दिसलें. अरुणला त्यांनीं ह्या असहकारितेचें कारण विचारतांच अरुण तक्रारीच्या स्वरांत सांगूं लागला, 'अरे पपा, ती मला लहान मुलासारखं कडेवर घेते.'

पण लहान मुलांत प्रौढत्वाची छटा आली म्हणजे जें गांभीर्य किंवा जी गूढता येते ती अरुणमध्यें मुळींच नाहीं. तो सरळ धोपटमार्गी आहे. इंग्लंडमधील एका भीमकाय प्रसन्न मनाच्या लेखकाची गोष्ट सांगतात. एकदा त्या लेखकाच्या तोलाचे कांहीं बडे गृहस्थ त्याच्याकडे गोष्टी बोलत बसले होते. त्याच्या पुराणप्रियतेवर टीका करतांना त्यांतला एक गृहस्थ सहज म्हणाला, "तुम्ही कांहीं घड्याळाचे कांटे मागें नेऊं शकत नाहीं." हें ऐकतांच आपला अवजड देह सावरीत तो लेखक उठला आणि घड्याळाचें झाकण उघडून त्यानें कांटे मागें फिरवीत म्हटलें, 'हें पाहा, मी कांटे मागें फिरवूं शकतों.' ह्या आख्यायिकेंत प्रतिबिंबित झालेला विनोदी मनमोकळेपणा अरुण आपल्या वर्तनांत

कित्येकदा न कळत दाखवतो. आळींत एका गृहस्थाकडील ट्रायसायकल आपणाला खेळण्यासाठीं मागून आणायला अरुण वडिलांना सांगत होता. वडील संकोची वृत्तीचे असल्यानें त्यांनीं खोटेंच सांगितलें, 'अरे, मीं त्यांना विचारलं, पण ते देत नाहींत.' इतकें सांगून ते लिहिण्यांत गढून गेले. पांच दहा मिनिटांतच अरुण ट्रायसायकलवर आरूढ होत्साता तेथें हजर होऊन म्हणाला, 'काय रे पपा, खोटं बोलतोस का ? मीं विचारल्याबरोबर सायकल दिली बघ त्यांनीं.' ह्या जहांबाज पोरापुढें वडील ओशाळे होऊन गेले !

अरुणला जनावरांचें, विशेषतः कुत्र्याचें फार वेड आहे. आमचा 'मोती' कुत्रा हा अरुणचा अत्यंत आवडीचा विषय आहे. आमच्या घरीं आला कीं तासचे तास 'मोती' च्या हालचाली पाहाण्यांत, त्या वर्णन करण्यांत आणि त्यांवर प्रश्न करण्यांत अरुण रमून जातो. 'मोती आळस देतोय्...त्याचे दांत किती छान आहेत ! त्याचं तोंड काळं कशानं झालं ? कोळशानं का रे गोपूकाका ?' असें अरुणचें बोलणें सारखें सुरू असतें. माझी त्याच्याशीं दोस्ती सुद्धा 'मोती–' च्या वशिल्यानेंच दृढ झाली. मी केव्हांही भेटलों कीं तो विचारतो, 'काय रे, मोती कुठाय् ?' अरुणच्या दृष्टीं माझें वर्णन 'मोतीचा मालक आणि माहितगार' एवढेंच आहे !

असें हें हृदयंगम गृहरत्न आहे. अरुणचें गांभीर्य विनोदी आहे आणि सामर्थ्य सात्त्विकपणाचें आहे. हें गृहरत्न फुलासारखें मोहक वाटतें; पण 'हिरा ठेवतां ऐरणीं–वाचे मारितां जो घणीं' असें टणकपणही त्याला आहे हें अनुभवानें कळतें.

★



दर वर्षी आमच्या 'आनंद' च्या बालमित्रांचें संमेलन भरतें. त्या वेळीं झकपक पोषाख करून प्रफुल्ल चेहेऱ्यांनीं बालगोपाल मंडळी वेळेच्या आधींच सभामंडपांत येऊन गर्दी करूं लागतात. समारंभाची व्यवस्था करण्यांत माझी कोण धांदल उडून गेलेली असते ! पण मी गडबडींत आहें ह्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून जो तो मला विचारीत असतो, "काय हो, तो जादूगार आलाय् का ?... केव्हां येणार ?" आणि मीं "आतां येईलच तो" असें उत्तर दिलें कीं मुलें खूष होतात. 'आज आपणांला गंमत पाहायला मिळणार' ह्याची खात्री पटून तीं आनंदित होतात.

'जादूगार' म्हटल्यावर तुम्ही कांहीं विलक्षण कल्पना बांधून बसाल. लांब डगला, दाढी मिशांचें जंगल वाढलेलें, गळ्यांत कवड्यांच्या माळा, हातांत तुतारी अशा वर्णनाचा तो भयंकर जादूगार नाहीं. आपल्या पुंगीच्या जादूनें उंदीर पळवणारा हा गृहस्थ नाहीं, तर 'मिकी माऊस' सारखा लहान, कसबी, धीट, स्वतः न हसणारा, पण तुम्हांला हसवणारा गोड चेहेऱ्याचा तो बालमित्र आहे. तो आपल्या बोलण्यानें किंवा कृतीनें तुमच्यांत खळबळ उडवील, पण त्याच्या स्वतःच्या चेहेऱ्यावर मुळींच चलबिचल दिसणार नाहीं. एका पिशवींत जादूचें सामान घेऊन तो प्रवेश करतो, तेव्हां टाळ्या वाजवून मुलें त्याचें स्वागत करतात. पण तो गोंधळून जात नाहीं. सरळ वाट काढीत तो व्यासपीठापर्यंत जातो आणि नांव पुकारलें जातांच वर चढून आपल्या प्रयोगाला सुरुवात करतो. ह्या जादूगाराचें नांव श्रीराम. आम्ही त्याला गमतीनें 'शिरा' म्हणतों आणि त्याची त्याच्याहून थोडी मोठी सुंदर बहीण आहे तिला 'पुरी' म्हणतों.

नेल्सननें आपल्या आईला विचारलें होतें म्हणतात कीं, " आई, भीति म्हणजे कशी असते ग ? मीं भीति पाहिली नाहीं. " श्रीराम असेंच म्हणूं शकेल. निदान सभाधीटपणाच्या बाबतींत तो अति शूर आहे. एकदा त्याच्या व्यायाममंडळांत गव्हर्नर आले होते. जिकडे तिकडे बंदोबस्त कडक होता. पण तेवढ्यांतून ही स्वारी डोळा चुकवून गव्हर्नरसमोर जाऊन उभी राहिली. सहा फूट भव्य इंग्रज गृहस्थाच्या पुढें हें सहा सात वर्षांचें गोजिरवाणें पोर नीट नजरेला नजर देऊन पाहात राहिलें ! गव्हर्नरांनीं श्रीरामच्या गालाला बोट लावून इंग्रजींत विचारलें, ' तुझं नांव काय ? ' श्रीरामनें शांतपणें जवळच्या हिंदी गृहस्थाला विचारलें, ' हे काय विचारतात ? ' आणि त्यानें गव्हर्नरांचा मनोदय सांगितल्यानंतर श्रीरामनें पुनः विचारलें, ' सबंध नांव कीं नुसतं नांव ? ' दुभाषी हसून म्हणाले, ' सबंध. ' त्याबरोबर गव्हर्नरकडे तोंड करून स्पष्ट शब्दोच्चारांत त्यानें आपलें नांव घरच्या पत्त्यासह सांगितलें. गव्हर्नरनीं स्मितपूर्वक शाबासकी दिली. चहूंकडे श्रीराम हा कौतुकाचा विषय होऊन राहिला. पण आपण कोणती बहादुरी केली म्हणून लोक आपणाकडे सकौतुक पाहात आहेत हें मात्र त्याला उमगलें नाहीं !

श्रीरामला यंत्रांचा फार नाद आहे. पण यंत्रांच्या बाबतींत त्याची आवड व उद्योग एकांगी नाहीं. तो ' एडिसन ' ही आहे आणि ' फोर्ड ' ही आहे. म्हणजे प्रयोग करून पाहाण्याची त्याची वृत्ति आहे, तशीच कारखाना काढण्याची हौसही भरपूर आहे. त्यानें घरांत विमानतळ बांधला आहे. त्याचें विमानाचें उत्पादन इतक्या झपाट्यानें चालतें कीं तें पाहून हिंद-शत्रूंच्या छातींत धडकी भरेल आणि हिंद सरकार आनंदित होईल. आपल्या प्रयोगासाठीं साधनें जमवण्याच्या छंदांत घरामध्यें होणाऱ्या अव्यवस्थेची तो पर्वा करीत नाहीं. एखादें यंत्र उभें करण्यासाठीं एखादी बाटली हवी असली आणि घरांत एखादी मूल्यवान् औषधानें भरलेली बाटली असली तर तो औषध खुशाल फेकून देतो आणि बाटली वापरायला घेतो ! खोकीं अशींच जमवतो ! रिळें, दोरे, कागदांचे पुट्ठे, काड्यांच्या पेट्या, ठोकळे, इत्यादि सामानानें त्याचें कपाट गच्च भरलेलें असतें. श्रीरामच्या त्या पदार्थसंग्रहांत कोणती वस्तु कशासाठीं आहे ह्याचें ज्ञान त्याचे प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्याशिवाय तुम्हांला होणार नाहीं. बॅडमिंटनचीं फुलेंच पाहा ! कितीतरी त्याच्या कपाटांत आढळतील. तुम्हांला कदाचित् खेळण्यासाठीं

तीं ठेवलीं आहेत असें वाटेल. पण जेव्हां तो आपलें ' लाऊड स्पीकर ' चें यंत्र मांडील तेव्हां तुम्हांला कळून येईल कीं हीं फुलें म्हणजे श्रीरामच्या कारखान्यांतले ' ध्वनिक्षेपक कर्णे ' आहेत !

ही सारी सामुग्री श्रीराम युक्तीनें जुळवतो. एका प्रसिद्ध स्टूडिओंत तो फोटोग्राफीचें काम पाहायला जातो. खुर्च्या, टेबलें करणाऱ्या एका कारखानदाराशीं त्यानें मैत्री जोडली आहे, ह्या चमकदार चेहेऱ्याच्या पोराला ' नाहीं ' म्हणणें कोणाच्याही जिवावरच येतें. श्रीरामचें सख्य वडीलधाऱ्या मंडळीशीं विशेष जडतें. ' आज माझा अमुक मित्र येणार आहे, ' असें तो घरीं सांगतो तेव्हां मंडळी एखाद्या लहान मुलाच्या स्वागतासाठीं तयार होऊन बसतात आणि श्रीरामचा मित्र म्हणून येतो तो श्रीरामएवढें मूल ज्याला असूं शकेल असा संसारी गृहस्थ !

आपल्याला मुलांमुलींनीं ' दादा ' म्हणावें ह्याची त्याला फार हौस आहे. पण सर्वांत लहान असणाऱ्या ह्या भावाला मोठ्या बहिणी ' दादा ' कसें म्हणणार ! मात्र मुंबईला त्याच्या मामाकडे श्रीरामची आवड पुरवली जाते. त्याची धाकटी मामेबहीण त्याला ' दादा ' म्हणते आणि ' दादागिरी ' च्या ह्या मोहानें आपल्या चिमुकल्या बहिणीचे हवे ते कोड पुरवण्यास हा छोटा माणूस तयार असतो.

श्रीरामचे वडील एक नमुनेदार विद्वान् आहेत. ते एक प्रख्यात मासिकाचे संपादक आहेत. श्रीरामला वडिलांचा वचक आहे, पण त्याला त्यांच्या संगतींत मोकळेपणा वाटत नाहीं असें नाहीं. एखादा युद्धविषयक किंवा चमत्कृतिपूर्ण चित्रपट आला कीं तो पाहाण्याचा श्रीरामला अनावर मोह होतो आणि मग सोबत म्हणून वडिलांना बरोबर चलण्याचा श्रीराम आग्रह करतो. " तुम्ही पैसे खर्च करूं नका, मी काढीन तुमचं तिकीट " असेंही सौजन्य तो दाखवतो ! [ अर्थात् हे पैसे वडिलांनींच हातखर्चासाठीं दिलेल्या मासिक तनख्यांतले असतात ! ] ह्या प्रेमळ आग्रहाला कोणता सहृदय पिता वश होणार नाहीं ? कित्येकदा मात्र कांहीं मागणी वडिलांजवळ प्रत्यक्ष करणें श्रीरामला अवघड वाटतें. मग वडिलांचें सर्व नांव त्यांच्या पदव्यांसह लिहून एका पाटीवर श्रीराम विनंति-अर्ज लिहितो आणि वडिलांना सहज दिसेल अशा ठिकाणीं ती पाटी ठेवून देतो !

भोवतालच्या जगांतलें साम्य आणि भेद हुडकण्यांत त्याची शोधक दृष्टि सदैव गुंतलेली असते आणि म्हणून पानांत एखाद्या वेळीं दाट भाजीचा पिरॅमिड दिसला कीं 'ही आपली पर्वती' अशी उपमा चटकन् त्याला स्फुरते. 'ज्ञानेश्वर' चित्रपटांत रेडा वेदवाणी बोलूं लागतांच श्रीराम उद्गारला, "हा * * * गातो आहे मागें." श्रीरामनें ज्याचें नांव घेतलें तो जुन्या जमान्यांतला रेडिओवर गाणारा एक पट्टीचा गायनाचार्य आहे. त्याला आणि त्याच्या चहात्यांना श्रीरामच्या ह्या उद्गारानें आनंद होईल कीं दुःख होईल देव जाणे! रेडिओवर एकच स्त्री गाते आणि ती म्हणजे 'ज्योत्स्ना भोळे' अशी श्रीरामची समजूत आहे. कारण जेव्हां जेव्हां रेडिओंतून कोमल स्वर उमटूं लागतात तेव्हां तेव्हां श्रीराम आनंदानें म्हणतो, "ज्योत्स्ना भोळे गाऊं लागली."

अलीकडे श्रीरामला व्यंगचित्रें काढण्याचा नाद लागला आहे. परवांच स्वारी सकाळीं माझ्याकडे आली. हातांतील कागदाची गुंडाळी माझ्यापुढें उलगडीत तो म्हणाला, "नाना हें पाहा मीं काढलेलं चित्र" मी मोठ्या उत्सुकतेनें पाहूं लागलों. चित्रांत एक माणूस पाण्यांत गटंगळ्या खात असलेला दिसत होता, कांठाशीं दुसरा एक माणूस उभा असून त्याला तो गटंगळ्या खाणारा माणूस म्हणत होता, 'मला पाण्यांतून वर काढ.' दुसरा म्हणत होता, 'मला वेळ नाहीं.' चित्रांतील रेषांत जिवंतपणा होता आणि पोषाख व प्रमाणबद्धता ह्यांच्याविषयींचीं समज विलक्षण दिसून येत होती. पाण्यांत पडलेला माणूस हें आपल्या समाजाचें चित्र होय असें त्यानें मला सांगितलें. ह्या बालचित्रकाराला कांहींतरी. तळमळीनें व्यक्त करायचें आहे ह्याची जाणीव चित्रांत प्रतीत होत होती. मीं श्रीरामला पोटभर शाबासकी दिली. प्रफुल्लित मुद्रेनें तो परतला. याची डौलदार मूर्ति अदृश्य होत असतांना त्याला उद्देशून म्हणावेंसें मला वाटलें, "श्रीराम, तुझ्यासारखीं कल्पक व उद्योगी मुलें आपल्या पूर्ण उंचीला चढलीं तर तूं चित्रांत रेखाटलेली परिस्थिति पालटण्यास काय वेळ लागणार आहे?"

★

# मोहन



संध्याकाळीं कसल्या तरी नादांत घरीं परत येत होतों मी. समोरून लहानग्या मोहनची स्वारी सुरगाडीवरून जोरांत येत होती. त्याचें लक्ष नव्हतेंच माझ्याकडे. असणार कसें? खळखळ वाहात जाणारा ओढा वाटेंत कोण भेटलें ह्याची पर्वा करतो का कधीं? भरभर फिरणाऱ्या वातचक्राला मध्यें काय लागलें ह्याची कुठें दखल असते? त्याची गति अविरोध चालू असायची. मोहनराव जोरांत होते. अंगांत नेहरू शर्ट आणि त्यावर लालभडक जाकीट. गोऱ्या पान कपाळावर केस उडत आहेत, डोळ्यांत वेगाची तल्लीनता, धुंदी आणि मजेदार झोपाळूपणा. त्याच्या त्या काश्मिरी मूर्तीकडे मी प्रेमभरानें पाहात त्याला हाक मारली, " मोहन. "

त्याची समाधि भंग पावली आणि तो लागलीच थांबला. वेगांत जेवढा तो तल्लीन होता तेवढाच थांबण्यांत तत्पर. मला पाहातांच हसायला लागला. " काय मोहनराव, अगदीं पाहात नाहीं आमच्याकडे?" " पाहायचं कसं? मी

गाडी चालवीत होतों ना?" नेहमींप्रमाणें सरळ उत्तर आलें. बोलण्यांत भाव असा कीं इतकें कसें तुम्हांला कळत नाहीं? समोरच्या माणसाचा अंदाज घेऊन किंवा त्याचा दर्जा वगैरे लक्षांत घेऊन कांहीं पद्धतीनें बोलतांना मोहन आढळणार नाहीं. आपल्या मनांतल्या विचारांना झटकन् उद्गार द्यायचा, एवढेंच त्याचें काम!

"मोहन, मला तुझी मुलाखत घ्यायची आहे." मीं म्हटलें.

"मुलाखत म्हणजे काय? ती कशी घ्यायची?"

"हें पाहा, गांधी, नेहरू ह्यांच्यासारखे मोठे पुढारी असतात ना, त्यांच्याकडे जाऊन माणसं माहिती काढतात आणि मग ती छापतात. त्या माहितीबरोबर त्यांचे फोटो देतात."

"मला तुम्ही प्रश्न विचारणार, मी तुम्हांला माहिती सांगणार आणि तुम्ही ती छापणार. होय ना? फोटो देणार का माझा?"

"हो हो तर" मीं लगेच म्हटलें.

"मग घ्या माझी मुलाखत. इथें घेतां? का घरीं जाऊं या?" मोहन अधीर होऊन म्हणाला.

मोहनराव इतके कां खुलले हें मला माहीत होतें. खूप बड्या माणसासारखें आपलें कांहीं तरी होणार ह्याची अटकळ येऊन त्यांची प्रसिद्धिप्रियता उचंबळून आली. जगानें आपल्या दिव्यांचा सारा प्रकाश आपल्यावर पाडावा ही इच्छा मोहनला अत्यंत प्रबळ आहे. कोठल्याही समारंभाच्या किंवा मिरवणुकीच्या मध्यभागीं उत्सवमूर्ति म्हणून आपण असावें अशी त्यांची इच्छा असते. नुकतीच घडलेली गोष्ट. मोहनच्या बंगल्यासमोरील पटांगणांत एक खानदानी लग्न झालें. मोठा शामियाना उभारण्यांत आला होता. पुष्पमाळांनीं सजवलेल्या मोटारींतून मोठी मिरवणूक निघाली. अनेक बँडचे ताफे, शेकडों गॅसच्या बत्त्या आणि वस्त्राभरणांनीं नटलेले स्त्रीपुरुष पाहून मोहन अधीर झाला. "अग चारुआत्या, माझा जरीचा पोषाख आण. मी मोटारींत बसतों" असें अधिकारवाणीनें मोहनराव सांगूं लागले. एवढ्या ऐश्वर्याचा मध्यबिंदु मीच असलों पाहिजे असें त्याच्या मनानें घेतलें. असो. मोहनच्या अशा वृत्तीमुळें मी मुलाखतीची गोष्ट काढतांच त्याला फार उल्हास वाटूं लागला. पण मी थकलेला होतों. येत्या रविवारीं येईन असें सांगितलें त्याला मीं.

रविवारीं मोहन माझी वाटच पाहात होता. घरच्या मंडळींनीं त्याला मुलाखत कशी घेतात ह्याची कांहीं कल्पना दिली असावी. कारण मला त्यानें विचारलें, "तुम्ही लिहायला नाहीं का आणलेंत कांहीं?" मीं हसून म्हटलें, "राहील माझ्या लक्षांत."

प्रश्नोत्तरें सुरू झालीं.

"तूं अहमदाबादला गेला होतास तेव्हां तुझ्याविरुद्ध फार तक्रारी आल्या म्हणतात. तूं तिथल्या एका बाईला दगड मारलास हें खरं का?"

"दगड मारला हें खरं, पण ती माझ्याकडे पाहून वाकडे डोळे करते आणि मला वेडावते असं मला वाटलं, म्हणून मीं दगड मारला."

"मग तिनें तुला वेडावण्याचं बंद केलं का?"

"मागून कळलं, ती मला वेडावत नव्हती. तिचे डोळेच वाकडे, [ म्हणजे तिरवे ] होते!"

"बरं. शाळेचं कसं काय चाललं आहे?"

"पहिल्यानें शाळेचा कंटाळा येत होता. आतां नाहीं. पण त्या मुली वाईट आहेत. आमच्या शाळेंत मुली कशाला? माझ्या बाकावर बसते ती गंगू फार वाईट आहे. मी मारीन तिला."

मोहनच्या ह्या उत्तरावरून स्वारी सहशिक्षणाविरुद्ध आहे असें दिसून आलें. मनांत म्हटलें हीं आपलीं बाळमतें लौकरच वितळून जातील!!

"तूं जुगलशीं [ धाकट्या भावाशीं ] भांडतोस का?"

"मुळींच नाहीं. तो माझ्याशीं भांडतो."

"तुझे उद्योग कोणते?"

"मी चरखा फिरवतों, चित्रं काढतों; आमच्या मास्तरांनीं वेळापत्रक दिलं आहे तें वाचतों. मी स्वावलंबन करतों. म्हणजे काय ठाऊक आहे का? आपलं ताट आपणच उचलायचं आणि मोरींत नेऊन ठेवायचं. आणि पान स्वच्छ करील त्याला मार्क देतों. परवां बापूसाहेबांनीं भाजी टाकली म्हणून ५० मार्क कमी केले त्यांचे." असे अनेक गमतीचे विषय मोहनराव सांगत होते. त्यांत

आपली बहादुरी आणि मधून मधून लोकांवर ताशेरे असत. ही गाडी प्रश्नोत्तराच्या रूळावर पुनः आणण्याकरितां मीं मध्येंच विचारलें, "तुला कोण व्हावंसं वाटतं?"

"राजा. म्हणजे चैन असते हो! छान छान पोषाख नि मोटार, हत्ती..." मोहन खूप वर्णन करूं लागला. परीच्या गोष्टींत त्यानें वर्णन वाचलें असावें. पण मध्येंच मीं म्हटलें, "अरे, पण तुला पुढाऱ्यांपैकीं कोण व्हावंसं वाटतं?"


"अं!" अंमळ विचार करून तो चटकन् म्हणाला, "नेहरू."

"शाबास" म्हणून मी कांहीं विचारणार होतों, इतक्यांत एक मोठा पतंग गच्चीवर तरंगूं लागला. मोहनचें लक्ष तिकडे जातांच तो जो सुसाट पळाला तो माझें कांहीं ऐकेनाच.

"अरे मोहन..." मी हाक मारतों, तों गच्चीवर पोचला सुद्धा होता तो.

मुलाखत अपुरीच राहिली!

★



# वसंत

माझा बालमित्र वसंत असेल बारा वर्षांचा. पण त्याला समजूत चार वर्षाच्या मुलाइतकीच आहे. त्याचें लहानशा नारळाएवढें डोकें, विचित्र नजर, चेहेऱ्यावर मध्येंच दिसणारी शांतता आणि मध्येंच दिसणारी चंचलता, डोळ्यांत व शब्दांत प्रकट होणारा प्रेमळपणा, ह्या सर्व गोष्टी लक्षांत राहाण्यासारख्या आहेत. एकदा पाहिल्यानंतर ह्या अवलियाला कोणी विसरणार नाहीं.

वसंताला कधीं त्याच्या आडनांवानें मी हाक मारतों, तर कधीं ‘आचार्य’ म्हणतों. पण कोटल्याही नांवानें पुकारा केला तरी “ऑ!—बरऽऽ!” एवढें प्रत्युत्तर यायचेंच. समुद्राच्या भरतीओहटीइतक्या ठरीवपणानें ‘आचार्य’ सकाळ संध्याकाळच्या चहाला हजर होतात. “काका—आला” (काका! मी आलों) अशी आपल्या आगमनाची वर्दी ‘आचार्य’ फाटकांतूनच उच्च रवानें देतात. चहा अर्धी बशी सुद्धा पुरतो. पण तो पाहिजे. आपली व माझी कपबशी नळाखालीं लगेच नेऊन ठेवायची आणि आपणच पाठीवर लगेच शाबासकी घ्यायची. कोठलेंही लहानसें काम केलें तरी वसंत तुमच्या शाबासकीकरितां अडून बसत नाहीं. स्वतःच ती घेतो.

रोजचीं कामें बिनचूक व्हावींत ह्याविषयीं ‘आचार्यां’ चा फार कटाक्ष आहे. सकाळीं माझी आंघोळ झाली कीं माझ्यापुढें ते वहाणा आणून ठेवतात, कोट पुढें करतात, इतकेंच नव्हे, तर धक्का देऊन दाराबाहेर जायला खुणावतात.

लागलीच दार लावून घ्यायचें, खिडकींतून नमस्कार करायचा ! 'ताई'च्या सकाळच्या कामांत कपाट पुसण्यापासून हरएक कामीं मदतनीस- म्हणून 'आचार्य' राबत असतात. बंगल्याच्या आवारांतलीं फुलें देवाला म्हणून दिल्याशिवाय ते परतायचे नाहींत. महिनोगणती शाळेंत जाऊन 'अ, आ' पुढें 'आचार्यां'ची प्रगति गेलेली नाहीं. ह्या 'अ, आ'ना सुद्धा अद्यापि मधले दांडे 'आचार्य' जोडीत नाहींत ! ! पण जेवण झाल्यावर शाळेंत जायचें मात्र कधीं चुकायचें नाहीं.

ह्या 'महानुभावा' चा शब्दकोश अगदीं लहान व तितकाच गूढ आहे. आतां दोन वर्षांच्या सान्निध्यानें मी त्या भाषेचा पंडित झालों आहें. वसंताला थोडेंसें कळूं लागल्यानंतर प्रथम ह्या आकाराचीं व वयाचीं माणसें दिसलीं कीं त्यांचीं नांवें त्यानें तत्सदृश सर्व माणसांना कायम केलीं आहेत. लहान मुलगा म्हणजे 'मामू' (रामू), तरुण विद्यार्थी म्हणजे 'बापू' आणि माझ्यासारखीं मोठीं माणसें म्हणजे 'काका.' वसंताच्या भाषेंत हींच सामान्यनामें आणि हींच विशेषनामें. ह्याच्या जोडीला अखिल स्त्री जातीची विभागणी 'बेबी', 'ताई', आणि 'काकू' अशा तीन प्रकारांत त्यानें केली आहे. पण ह्या ठराविक नामकरणांत कांहीं अपवाद आहेत. 'टान्टी' (शांती), मामा, मुलीधल (मुरलीधर) हीं स्वतंत्र नांवें आहेत. आमचे हजरत सहज त्याला What are you doing? असें चेष्टेनें एकदा म्हणाले. तेव्हां त्यांच्या त्या इंग्रजी उच्चारांचें बरोबर नोटेशन 'पॅपॅपॅपपान्' असें करून तेंच नांव 'आचार्यां' नीं आतां हजरतना दिलें आहे. फळविक्यास 'आंबा' आणि नापितराजास 'डाडी' (दाढी) हीं नांवें वसंतनें कां दिलीं असतील हें मार्मिकांना सहज उमगेल. 'ऐन दुपारीं' हा वसंताच्या शब्दकोशांत सिनेमाला प्रतिशब्द आहे. 'पायाची दासी' ह्या बोलपटांतल्या एका गाण्याचा आरंभ ह्या शब्दांनीं आहे. तो चित्रपट पाहिल्यावर हें नांव 'आचार्यां'नीं मुक्रर केलें. पण 'झूला' हा चित्रपट 'आचार्यां' च्या विशेष लक्षांत आहे. कोणीही माणूस सिनेमाला जायला निघाला याचा अर्थ तो 'झूला' पाहायला निघाला असा 'आचार्य' करतात.

कोणाच्या अंगावर सुंदर कापड पाहिलें कीं वसंतराव त्यावर हात फिरवून 'आणूं' (आपणाला असें आणा) म्हणतात. मीं किंवा दुसऱ्या कोणीं 'आणूं अं !' असें आश्वासन दिलें कीं समाधान होतें. एखाद्या भगिनीचें सुंदर पातळ

पाहिलें तरी 'आणूं' ची घोषणा होतेच. स्त्रीपुरुषांच्या वेषभूषेंतला फरक ह्या महंताला माहीत नाहीं.

वसंताच्या बुद्धीची वाढ झाली नाहीं. ती उद्यां होईल. हळुहळू वाढ होत आहे अशीं लक्षणें सुदैवानें दिसत आहेत. पण त्याकडे विशेष दक्षतेनें मी पाहात नाहीं. त्याच्यांतली भावना फार आकर्षक आहे. आमच्या बंगल्यांतल्या बिऱ्हाडांत जीं त्याला कौतुकानें वागवतात त्यांच्याचकडे तो जातो. माणसाचा रागलोभ त्याला चटकन् समजतो. आमच्या घरांत मंडळी व्यग्र दिसली कीं काढता पाय घेऊन तो जड पावलांनीं घरीं जातो. मी किंवा त्याची 'ताई' आजारी असली तर वसंत जवळ येईल, शेकण्याची पिशवी आणून देईल, ताप पाहील आणि पाय रगडूं लागेल. हाताला दोन बोटांनीं टोचून दाखवून 'बद्र' असें म्हणेल. भावार्थ असा कीं "इतके आजारी आहां तर चला बसमधून डॉक्टरकडे जाऊं आणि इंजेक्शन् घेऊं." दुसऱ्या कोणाला मार दिला तर हाच रडूं लागतो. एखाद्या वेळीं रस्त्यांत एखादें करुण दृश्य पाहून घरीं आला तर तासन् तास धुमसून हुंदके देत बसतो. रडण्याचें कारण त्याला सांगतां येत नाहीं! ह्या अनामिक वेदनांचें मूळ कित्येकदा पुष्कळ दिवसांनीं कळून येतें. आपणाला आईनें मारलें तर तो माझ्याकडे येतो. त्या दिवशीं मी भेटलों नाहीं तर दुसऱ्या दिवशीं माझी गांठ घेईल. रडव्या सुरांत व मोडक्या तोडक्या शब्दांत माराची हकीकत सांगेल आणि माझ्याकडून समजूत करून घेईल. आईला तो घरांत अनेक उद्योग करून सतावतो. पण कधीं ह्याच्या खोड्यांनीं त्रासून व ह्याच्या विकासाची आशा नाहीं ह्या कल्पनेनें दुःखी होऊन आई रडूं लागली कीं तो कावराबावरा होतो. आईच्या जवळ बसून स्फुंदूं लागतो आणि मग एक दोन दिवस स्वारी अगदीं शहाण्याप्रमाणें वागते. वसंताचा हा प्रेमळपणा निर्व्याज आहे, स्वच्छ आहे. तें एक गोड सरोवर आहे. बुद्धीची रूक्ष माळरानें तुडवण्यापेक्षां ह्या शुद्ध जलाशयाच्या कांठीं बसणेंच मला आवडतें. त्यांत माझी तहानही भागते आणि माझें प्रतिबिंबही दिसतें.

वसंताला संगीताचें विलक्षण वेड आहे. सिनेमांतलीं अवघडांतलीं अवघड गाणीं त्याच्या लक्षांत राहातात. 'दूर देसका रहनेवाला', 'राधिका चतुर बोले', 'घटा घन घोर घोर', इत्यादि लोकप्रिय पदांना तुम्ही कोठेंही सुरुवात करा कीं आमचे 'आचार्य' तुमच्याबरोबर साथ देतात. त्यांचा शब्दकोश मर्यादित

असला तरी स्वरसंग्रह दररोज वाढत आहे. नवीन नवीन चित्रपट व त्यांच्यांतलीं लोकप्रिय गाणीं ह्यांची भर पडत असते. गाण्याचे शब्द स्पष्ट उमटायचे नाहींत, पण स्वर मात्र अगदीं अचूक यायचे. बुद्धि चार वर्षांच्या मुलाची आणि संगीताविषयींची रसिकता पाहावी तर चांगल्या सुसंस्कृत माणसाची ! वसंतमधील हा मजेदार विरोध म्हणजे एक गूढ आहे. नादलुब्धतेचा जवळचा संबंध बुद्धीशीं नसून अंतःकरणाशीं असतो असेंच नाहीं का सिद्ध होत ह्यावरून ?

दुपारची रखरखीत उन्हाची वेळ. आकाशांत एखादी घार कोठें हिंडत असेल. आमचे ' आचार्य ' खिडकींतून शून्य दृष्टीनें अनंत नीलिम्याकडे पाहात असतात. इतक्यांत शेजारच्या इमारतींतून रेडिओवरून गीत उमटूं लागतें.

" मै क्या जानुं क्या जादु है "

वसंतला गीत कोठून ऐकूं येत आहे तें कळत नाहीं. पण सर्व चित्त कानांत एकवटून स्वारी ऐकत असते. गीताच्या सुरांनीं अगदीं वरची पायरी गांठली कीं तो नाचूं लागतो. त्या वेळीं त्याच्या चेहेऱ्यावर दिसणारा अमर्याद आनंदाचा भाव मीं अद्यापि कोठें पाहिला नाहीं. कलकत्याच्या प्राणिसंग्रहालयांत सिंह पाहिल्यावर आपल्या आईचें ( दुर्गेचें ) वाहन दिसलें म्हणून श्रीरामकृष्ण नाचूं लागले किंवा समुद्राचा नीलिमा पाहून आपला घननीळ प्रभूच भेटला अशा परमानंदांत पाण्यावरच चैतन्यदेव चालत जाऊं लागले असें म्हणतात. अंतराळांत पसरलेल्या गीतलहरींनीं वसंताच्या चेहेऱ्यावर जो हर्ष उसळलेला दिसतो त्याचें स्वरूप कांहींसें रामकृष्ण, चैतन्यांच्या त्या दैवी उन्मादासारखें मला वाटतें.

वसंत क्वचितच खिन्न असतो, रिकामा तो सहसा बसत नाहीं, आपण आपल्या भाषेंत बोललों तरी त्याला सर्व समजतें आणि स्वतःच्या भाषेंत तो उत्तरें देतो. कपट त्याला ठाऊक नाहीं, हास्याचा मनमुराद उपभोग तो घेतो, म्हणून मला त्याच्याबद्दल कुतूहल वाटतें, प्रेम वाटतें, इतकेंच काय, पण त्याच्या सात्त्विकपणाबद्दल हेवा सुद्धा वाटतो. माझ्या बुद्धीचा आजचा विकास कायम राहून जर वसंताचें अंतःकरण मला मिळालें तर मी संतपदावर चढेन. पुण्याबाहेर गेल्यावर माझ्या मनाला पदोपदीं जखडून परत घराकडे खेचणारे तीनच भावबन्ध मला आहेत. एकाविषयीं सांगण्याचें हें स्थळ नव्हे. बाकीचे दोन म्हणजे माझा अबोल ' मोती ' आणि आमचे गूढभाषी ' आचार्य. '

★




माझ्या आईनें माझ्या लहानपणीं मला प्रकृतिस्वास्थ्य लाभावें म्हणून दूधभोपळा खाण्याचें वर्ज केलें. हा तोडगा करतांना तिनें नर्मदेच्या पाण्यांत एक दूधभोपळा सोडून दिला असें ती सांगते. ह्या गोष्टीची मला नेहमीं मौज वाटे ( अजूनही वाटते ). अज्ञात प्रदेशांतून माझ्याकडे येणाऱ्या रोगांना होरेशिअसप्रमाणें एका पुलावर ह्या फळराजानें अडवून धरलें आहे अशी मजेदार कल्पना माझ्या मनांत नेहमीं येई आणि कित्येकदा स्वप्नांत हा वीर मनुष्य देहानें माझें कुशल विचारण्यास आला आहे असा भास होई. पण स्वप्नसृष्टीची हद्द ओलांडून एका लहान बालकाच्या रूपानें तो एक दिवस माझ्याकडे आला असें लहानग्या ललितेला मीं प्रथम पाहिलें तेव्हां मला वाटलें ! खरोखर गोरी व गबदूल ललिता अगदीं दूधभोपळ्यासारखी वाटली मला आणि हें साम्य केवळ बाह्यरूपापुरतें नव्हतें. अंतरंगीं देखील माझ्या हिताची कळकळ आणि साधेपणाची गोडी ह्या भोपळ्याप्रमाणें भरपूर आहे असें पुढें तिच्या निकट सहवासावरून मला कळून आलें.

ललिता प्रथम माझ्याकडे येण्यास बिचकत असे. पण तिची मोठी बहीण मीना माझी अतिशय आवडती बालमैत्रीण असल्यानें ललितेला माझ्याबद्दल

विश्वास वाटूं लागला. माझ्याबद्दलच नव्हे तर कोणाहीविषयीं तिचें हेंच धोरण असे. मीना ज्यांच्याशीं निर्भयपणें वागूं शकते तीं 'माणसें.' त्यांच्याजवळ जायला हरकत नाहीं अशी ललितेची श्रद्धा असे. आतां मात्र ती कमालीची धीट झाली आहे. माझ्याकडे प्रतिष्ठित स्त्री-पुरुषांची मजलस भरली असली तरी ती न बिचकतां माझ्यापर्यंत येईल आणि मला म्हणेल, "नाना, एवढ्या झग्याच्या गुंड्या लावून द्या" जणूं हें ह्या माणसाचें कामच आहे, तें त्याला सांगायचें आणि त्याच्याकडून करून घ्यायचें असें तिला वाटतें. सिनेमाच्या जाहिराती मिरवत चाललेल्या असल्या आणि मी रस्त्यावर उभा असलों कीं आपल्या स्थूल देहावरील पोषाख एखाद्या मारवाडणीप्रमाणें सावरीत ललिता येईल आणि म्हणेल, "नाना, पळा, ती लाल जाहिरात घेऊन या." मीं जरा तिची खोडी काढली किंवा तिला 'ठके' अशी हाक मारली कीं "का हो नानटल्या!" असें तिरस्कारदर्शक संबोधन आलेंच. पण ह्या रागाच्या संबोधनांत सुद्धा आदरार्थी बहुवचन कायम असतें हें लक्षांत ठेवण्यासारखें नाहीं का?

मैत्रीच्या बाबतींत ललिता समुदायाची भोक्ती नाहीं. तिची एकच मैत्रीण आहे. तो ललितेमागें सावलीसारखी असते. (ललिता आणि तिची मैत्रीण ह्यांच्या गोऱ्या-काळ्या रंगांतल्या विरोधामुळें तर ही सावलीची उपमा फारच खुलून दिसते!) ह्या मैत्रिणीचें नांव मालू. ललितेजवळ एक फूल जर असलें तर तें मालूला मिळायचें; दोन असलीं तर एक स्वतःसाठीं ठेवायचें आणि एक मालूला द्यायचें, हें अगदीं नक्की ठरलेलें असतें आणि ह्यांत तिऱ्हाईत कोणाला वांटा मिळत नाहीं. मात्र एखाद्या वेळीं स्वतःची व मालूची सोय होऊन तिसरें फूल उरत असलें तर ललिता उदार होते आणि मला तें देऊन म्हणते, "नाना, हें तुमच्या बायकोला फूल घ्या."

मध्यें कांहीं दिवस ललिता आपल्या आईबरोबर कर्नाटकांत राहायला गेली होती. तेथून दोन चार कानडी शब्द ती शिकून आली. पण एवढ्या अगाध ज्ञानावर आपण कानडी भाषा शिकलों असा विलक्षण अभिमान तिला उत्पन्न झाला आहे. "नाना, तुम्हांला कानडी येतं का?" असें तिनें विचारलें कीं मी अर्थातच 'नाहीं' म्हणतों. मग ती म्हणते, "आम्हांला येतं. हुबळीला शिकलों आम्ही." "कुणाशीं तुम्ही कानडी बोलत होतां?" असें विचारतांच ललिता उत्तर देते, "भिकारणींशीं." ह्याहून व्यापक प्रमाणावर जनतेशीं कोण समरस होणार?


आपल्या घरांत जशीं माणसें आहेत तशींच दुसऱ्यांच्या घरीं असतात असें ललितेला वाटे. चहाच्या सेटप्रमाणें प्रत्येक कुटुंबांत माणसाचा ठरीव सेट असतो अशी ललितेची दृढ कल्पना होती. इतकेंच नव्हे, तर तिच्या ह्या कल्पनेप्रमाणें प्रत्येक घरांत तीं तीं माणसें ठरीव भूमिकाच करतात असाही ललितेचा समज होता. "तुमची आई तुम्हांला रागवेलना?" "तुमची आक्का ( आजी ) तुम्हांला पोळी देते कीं नाहीं?" "तुमचे बाबा ( पणजोबा ) कुठें असतात?" अशीं गमतीदार प्रश्नात्मक किंवा उद्गारात्मक वाक्यें माझ्याशीं बोलतांना तिच्या संभाषणांत येत. अलीकडे मात्र स्वारी सर्वत्र संचार करूं लागल्यापासून कुटुंबाबद्दलची ही तिची 'सेट'—कल्पना मावळत चालली आहे.

ललितेला उसना विनय साधत नाहीं, शिष्टाचार जमत नाहीं आणि तोंड-देखलेपणानें बोलतां येत नाहीं. "नाना, उद्यां आमच्याकडे जेवायला या. माझा वाढदिवस आहे. पण मला कांहींतरी छानसं द्या. आरसा द्या नाहीं तर उंट द्या." असें मनमोकळेपणानें ललिता सांगते आणि ह्या देवघेवीच्या व्यवहारांत आपण कांहीं गैर करीत आहोंत असा पुसट संशय सुद्धा तिच्या तोंडावर दिसत नाहीं!

पण ललितेच्या ह्या निष्कपट स्वार्थीपणाला औदार्याची तितकीच रम्य बाजू आहे. तिच्याजवळ दोन दाणे किंवा पेपरमिंटच्या दोन वड्या असल्या तर मागतांक्षणीं मला त्यांतली एक मिळायचीच. दुपारच्या कडक उन्हांत मी घरीं जायला निघालों तर कधीं अगदीं नैसर्गिक प्रेमळ स्वरांत ललिता म्हणते, "नाना, तुम्ही उन्हांत खूप लांब जेवायला कां जातां? आमच्याकडे चला." घरच्या वडील मंडळींचें अनुकरण करून ललिता कित्येकदा मला चहाला बोलवायला येते आणि एखादा दिवस मी ऑफिसला आलों नसलों तर दुसऱ्या दिवशीं प्रथमदर्शनींच विचारते, "नाना, तुम्हांला ताप आला होता का?" अशा मधुर शब्दामृतानें शरीरांतील मृतपेशींना नवें चैतन्य आलें तर त्यांत काय नवल!

जीवन्मुक्तीचा आनंद मिळवायचा असेल तर पांडित्याचीं आभरणें झुगारून बाल्यवृत्ति अंगीं आणा असें आपले धर्मग्रंथ सांगतात. ही आनंदमय बाल्यवृत्ति कशी असावी ह्याचा आदर्शच ललिता आहे. तिच्या वृत्तीपर्यंत पोचायचें म्हणजे गौरीशंकरापर्यंत जाण्यासारखें आहे. मला तें अशक्यप्राय वाटतें. पण युरोपियन संशोधकासारखाच मी आशावादी आहें. कारण ह्या निरागस वृत्तीच्या पातळीपर्यंत चढण्याच्या नुसत्या प्रयत्नांत देखील मनाचें वैभव केवढें वाढणार आहे!

★



# शशिकान्त

परवांच आमचा चिमुकला पाहुणा शशिकान्त आपल्या गांवीं परत गेला. आम्हां सर्वांनाच फार सुनेंसुनें वाटत आहे. आमची मोलकरीण सुद्धा खिन्न झाली आहे. ती सारखी त्याला आठवून म्हणते, " पोर कसं अक्षी सोन्यावाणी होतं."

खरोखरच शशिकान्त सोन्यासारखा मुलगा आहे. कांति अगदीं सोन्यासारखी. दिसायला मोठा सुरेख. आम्ही त्याला 'नेपोलियन' म्हणतों. त्याचें तें भव्य कपाळ, त्यावर भुरभुरणारें जावळ, डोळे किंचित झोपाळू, जिवणी अगदीं लहान, वागण्यांत ऐट आणि एक पाय जरा दूर करून व पोटावर आडवा हात ठेवून उभें राहाण्याची रीत ह्यांमुळें 'नेपोलियन' ची उपमा त्याला शोभतेही. पण त्याच्या वृत्तींत मात्र 'नेपोलियन' पणा कांहीं नाहीं. तो चंचल नाहीं, साहसापेक्षां समंजसपणाकडे त्याचा कल अधिक आहे, जगावर प्रभुत्व गाजवलेंच पाहिजे असा अट्टाहास त्याच्या वृत्तींत नाहीं. तो सुखवादी आहे आणि स्वतःचें कौतुक करून घेण्यासारखी परिस्थिति फार ताप न घेतां तो उत्पन्न करूं शकतो.

साधारणपणें मुलांच्या चेहेऱ्यावर जी भेदरलेली वृत्ति दिसते तिचा अभाव आहे त्याच्या चेहेऱ्यावर. अनेक वर्षें मोठें शिस्तशीर जीवन घालवल्यानंतर माणूस जसा शांत होतो तसा शशिकान्त आजच आहे. आपली आपण सोय लावून घेणें ह्यांत विषेश संकोच तो करणार नाहीं. सकाळीं उठल्यावर स्नान वगैरे झाल्यावर आपल्या आत्याबाईस म्हणेल, "हं, मला तिटी लाव." सायंकाळीं जेवणांत मीठ जितक्या सहजतेनें आपण मागून घेतों तितक्याच सहजतेनें तो आपली दृष्ट लोकांकडून काढवून घेतो. "हं. चल आतां माझी दृष्टीची वेळ झाली." असें न चुकतां तो घरांतल्या जाणत्या स्त्रीला सांगतो. इतकेंच काय, पण स्वतःचीं औषधेंही त्याला ठाऊक आहेत. ज्या आपल्या काकाबरोबर तो आमच्याकडे आला, त्याला तो दररोज रात्रीं सांगे, "अरे दत्तूकाका, आज मी उन्हांतून फिरलों, मला नैट्रोमूर दे." "माझं डोकं दुखत आहे, कॅलीफास दे."

दुसऱ्याला समजावून सांगणें किंवा त्याची जरा गंमत करणें असा मिस्किलपणाही ह्या सद्गृहस्थांत आहे. आमचा मोत्या त्याला फार आवडायचा. मोत्याच्या कांहीं विशिष्ट हावभावांकडे पाहून आम्हांला शशिकान्त सांगायचा, "आतां मोत्या काय म्हणतोय् ठाऊक आहे का? त्याला पाव पाहिजे आहे." म्हणजे हे राजेश्री आम्हांला मोत्याच्या मनांतील भाव सांगणार! कधीं एक हात लाकूड आणि नऊ हात ढलपी अशा बाता शशिकान्त मारील आणि बाजू अंगलट आली कीं 'मी फार थापा मारतों नाहीं?' असें हसत हसत म्हणेल!

आमच्या इथें असतांना शशिकान्त दररोज आपल्या आत्याबाईला म्हणे, "माझ्या आईला पत्र लिही." आत्याबाई पत्र लिहायचें सोंग करून बसल्या कीं हा मोठ्या गंभीरपणें सांगायचा, "हं, लिही. मी इथं रडत नाहीं, हट्ट करीत नाहीं. तुझी मला आठवण होते तरी मी कुणाला त्रास देत नाहीं...." स्वतःचें पत्र म्हणजे मात्र श्री–ग–णे–शा इत्यादि अक्षरें एका कागदावर लिहायचीं. ह्यांत आपल्या मनांतला सर्व मजकूर लिहून झाला असें शशिकान्तला वाटतें.

प्रौढासारखीं बोलणारीं मुलें मला कधींच आवडलीं नाहींत. पण शशिकान्त मात्र त्याला अपवाद आहे. त्याच्या त्या प्रौढासारख्या बोलण्याचालण्यांत शैशवाचें कोणतें माधुर्य आहे ह्याचा अजून मला शोध लागलेला नाहीं; पण कांहीं तरी आहे खास. आपल्या प्रयाणामुळें आपल्या आतेला दुःख होणारच हें

जाणून तिला म्हणायचें, "मी जाणार म्हणून तूं वाईट वाटून नको घेऊं. मी येणार आहें दोन महिन्यांनीं परत." एकदा आमच्या म्हाताऱ्या मोलकरणीशीं चाललेला शशीचा संवाद मीं ऐकला.

"काय ग ! तूं इतकी म्हातारी नि भांडीं कां घासतेस ?"

"काय करूं रे बाबा ! पोटाला लागतं ना ? पैसे नकोत का ?"

"मी बडोद्यास गेलों कीं तुला पैसे पाठवून देईन. तूं काम करीत जाऊं नकोस."

म्हातारीनें साश्रु नयनांनीं ह्या चिमुकल्या पाहुण्याच्या तोंडावरून हात फिरवला आणि आपल्या कानशिलावर बोटें मोडलीं !

असा हा चिमुकला पाहुणा पुनः केव्हां येईल ह्याची आम्ही सर्वजण वाट पाहात असतों. पण तो पुनः येईल त्या वेळीं चिमुकलाच राहील का ?...निदान थोडासा चिमुकलाच आहे तोंवरच त्यानें परत यावें अशी तीव्र इच्छा आहे.

★



# मोत्या

मोती आमच्या घरीं आला तेव्हां किती लहान होता! आमच्या घरींच त्यानें डोळे उघडले म्हणा ना! आणि डोळे उघडल्यावर भोवतीं जेवढें जग त्यानें न्याहाळलें तेवढेंच त्यानें 'आपलें' असें ठरवून टाकलें. त्या चिमुकल्या जगाचा त्याला कंटाळा नाहीं. आपलें जग विशाल व्हावें, दुसऱ्या क्षेत्रांत जाऊन नवे अनुभव पैदा करावे ह्याचा ध्यास त्याला मुळींच नाहीं. मी, माझी पत्नी, माझे ऋणानुबंधी चार मित्र, हेंच त्याचें जग. ह्या जगांत तो खेळतो, खातो, मस्ती करतो, झोपतो, प्रेम करतो आणि रागावतोही!

त्याच्या मुद्रेवरून आम्हीं त्याचीं किती तरी नांवें ठेवलीं आहेत. त्याचा चेहेरा मवाळ गुजराथ्यासारखा आहे म्हणून त्याला आम्ही 'मोतीभाई' म्हणतों. अंग पांढरें, डोकें काळें, कपाळावर मधोमध गोपीचंदनाचें गंध लावल्यासारखी एक पांढरी रेघ अशा वर्णनाच्या ह्या प्राण्याला 'मोतीबुवा काळतोंडे' हें नांव किती छान दिसतें! त्याच्या डोळ्यांत उच्छृंखलपणा आणि अजाणपणा ह्यांचें असें मजेदार मिश्रण आहे कीं कधीं कधीं 'भंगड' हें नांव त्याला खरोखर शोभणारें आहे असें मला वाटतें. कधीं 'चमन' तर कधीं

'चंबू' अशाही नांवांनीं मी त्याला संबोधतों. पण ह्या अनेक नांवांपैकीं कोठल्याही नांवानें मीं हाकारलें तरी स्वारीला कळतें. शेपूट हलवून त्या हाकेला 'ओ' यायचीच.

मोतीला एकंदरींत मंडळींत बसण्याची हौस फार. आमच्या गप्पागोष्टींत ह्याच्या कौतुकाचा विषय निघाला तर तें त्याला बरोबर उमगतें. कान पाडून आणि चेहेरा शक्य तितका गरीब व हळुवार करून मोती आपलें कौतुक ऐकत असतो. गोल पद्धतीचें पातळ नेसलेली स्त्री त्याला परिचित आणि निरुपद्रवी वाटते. परवांचीच गोष्ट. सरला आमच्याकडे पहिल्यानेंच आली होती. पण अनेक वर्षांची ओळख असल्यासारखें मोतीनें दाखवलें. तिच्या गोल पातळाच्या घोळकिनारीवर मोठ्या विश्वासानें स्वारी झोपली! मोतीला राग आहे तो लांड्या विजारी घालणाऱ्या मुलांचा! त्यांत तीं मुलें दिसायला ओबड-धोबड असलीं म्हणजे तर विचारूंच नका! कांहीं मुलांनीं मोतीच्या लहानपणीं त्याला दगड मारले तेव्हांपासून अशा मुलांवर त्याचा दांत आहे.

मोतीला सारें सुरेख, ठाकठीक पाहिजे. विचित्रपणा दिसला कीं त्याचें पित्त खवळतें. आमच्या घरावरून एक सायकल-रिक्षा जाते. तिचा आकार खरोखरच हेंगाडा आहे. तिची घंटा ऐकली कीं मोती घरांतून खवळून भुंकायला लागतो. नागडेउघडे वडारी-डोंबारी जातांना दिसले कीं मोतीचें माथें भडकतें. पोषाखांत सुद्धा भडक रंगाचे कपडे किंवा हास्यास्पद फॅशन्स कोणीं केल्या कीं मोती चिडतो. आमचे चित्रकार भाऊसाहेब आले एकदा. फाटकांतून त्यांच्यावर मोत्या भुंकूं लागला. 'का रे, मला ओळखलं नाहींस का?' असे भाऊसाहेबांचे शब्द माझ्या कानांवर पडले. मी बाहेर येतो तों मोतीच्या भुंकण्याचें कारण लक्षांत आलें. भाऊसाहेबांनीं हिरवी हॅट, गडद निळ्या रंगाचा कोपरीवजा शर्ट असा कांहीं चमत्कारिक पोषाख केला होता. 'तुफानी तमंचा' वगैरेसारख्या चित्रपटांतला नायक [अथवा खलनायक म्हणा!] स्टूडिओमधून परस्पर माझ्याकडे आला कीं काय असें मला वाटलें! तेव्हां मीं भाऊसाहेबांना म्हटलें, 'मोत्यानें तुम्हांला ओळखलं हो! पण तुमच्या पोषाखाबद्दल तो नापसंती दाखवतो आहे.'

मोतीला गोड खाण्याचें अतोनात वेड आहे. गुरुवारीं दत्ताला कधीं कधीं पेढ्यांचा नैवेद्य असतो आमच्याकडे. पूजाविधि होईपर्यंत मोती तसबिरींतल्या

कुत्र्यासारखा अचल बसून राहातो. मी पुष्कळदा म्हणतों कीं ह्याला दहा रुपयांची नोट दिली तर हा प्रथम 'मथुरा–भुवन', कडे धाव घेईल !

मोतीचे आम्ही खूप लाड करतों. पण त्याबद्दल लाचारी दाखवायची त्याची तयारी नाहीं. आमच्यावर त्याची अतोनात भक्ति आहे. पण त्या भक्तींत मिंधेपणा नाहीं. ह्यांनीं आपलें कौतुक करावें हा आपला जन्मसिद्ध हक्कच आहे, असें तो मानतो. त्याची लहर नसली तर तो कधीं जवळ येणार नाहीं. मोतीची दुपारची वामकुक्षी चांगली दोन तीन तास चालते. तेवढ्यांत आमच्यापैकीं कोणीं त्याच्या अंगावरून हात फिरवला, तरी तो गुरगुरून आपली नापसंती व्यक्त करतो. आपली झोप मोडलेली स्वारीला बिलकूल खपत नाहीं.

मोती वृत्तीनें जितका लहरी, तितकाच 'रोमँटिक' आहे. सायंकाळीं सुशिक्षित स्त्रीपुरुषांनीं गजबजलेल्या टिळकरोडवरून नाचतबागडत स्वारगेटपर्यंत जावें आणि एका ठरलेल्या उपाहारगृहांत शंकरपाळीं खावीं हा अगदीं आवडता कार्यक्रम आहे त्याचा आणि म्हणून ऊन खालीं झाल्यापासून माझ्या अंगावर उड्या मारून सारखें बाहेर पडण्यास तो सांगत असतो.

चांदण्याचें त्याला विलक्षण वेड आहे. चांदण्या रात्रीं मोतीला बाहेर सोडावें आणि बराच वेळ हा कां येत नाहीं म्हणून आपण बाहेर जाऊन पाहावें, तों समोरच्या पठारावर स्वारी ऐटींत बसलेली असते. आसमंत भागीं चिटपांखरूं नाहीं. नजर चंद्राकडे ! चेहेऱ्यावर आनंद आणि आश्चर्य !

वरतीं खालीं दिसतें गगन
मध्यें लंबित अपुलें भवन
वातावरणीं आधाराविण
गोजिरवाणीं-फेकला चेंडु हा कोणीं ?

असा प्रश्नच मोती आपल्या मनाशीं विचारत आहे असें वाटतें.

कित्येकदा अगदीं उदासपणानें स्वस्थ बसायचें आणि दीर्घ निःश्वास सोडायचे असें मोती करतो. विरहाची दहशत त्याला फार वाटते. आम्ही त्याला बराच वेळ घरीं ठेवून बाहेर गेलों म्हणजे तो खिन्न होतो. आम्ही परत आल्यावर

कित्येक तास मग तो आमची पाठ सोडत नाहीं. पुनः हे आपणांला सोडून जातील कीं काय अशी भीति त्याला वाटत असावी. एकलेपणानें गांजलेल्या माझ्या अंतःकरणाला मोती अनेकदां साथ देतो. खिडकींतून येणाऱ्या चंद्रप्रकाशांत बसून माझ्या अस्वस्थ मुद्रेकडे तो सहानुभूतिपूर्ण डोळ्यांनीं पाहातो, क्वचित् शेपूट हलवून सांत्वनाचा प्रयत्न करतो आणि माझ्या आधींच पुष्कळदा निःश्वास सोडतो. समजुतीचे चार शब्द सांगावे इतका भाव स्फुरलेला त्याच्या तोंडावर मला कित्येकदा दिसतो.

—आणि मग असें वाटतें, स्वर्गाच्या द्वारीं धर्मराजाची निष्ठा पाहून धर्माच्या संगतीं गेलेल्या कुत्र्यानें आपला देह टाकून दिला आणि आपलें यमधर्माचें खरें रूप धारण केलें, तद्वत् ह्या मोतीच्या देहांतून आपला पाठीराखा देव तर नाहीं प्रकट होणार ?

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

★

जगांतील सर्व देशांत, सर्व काळीं, सर्व लोकांना

# छोट्यांना तशाच मोठ्यांना आवडणाऱ्या कथा

जगाच्या ग्रंथभांडारांत असे कांहीं अपूर्व ग्रंथ आहेत कीं ज्यांची गोडी, आज केवढा जरी काळ लोटला तरी, यत्किंचितही कमी झालेली नाहीं. इंग्रजी व संस्कृत या भाषांत असे ग्रंथ कितीतरी आहेत. त्यांतून कांहींचीं निवड करून, मुलांना समजेल अशा सोप्या व गोड मराठी भाषेंत लिहवून मुलांचा त्यांच्याशीं परिचय करून देण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. पुनः पुन्हा वाचाव्याशा वाटणाऱ्या, उलट जितक्या जितक्या त्या वाचाव्या तितकी तितकी ज्यांची गोडी अधिकाधिक वाढूं लागते, अशा कांहीं अपूर्व माधुरीनें भरलेल्या कथा आहेत ह्या.

## मराठी पेहेरावांतील विलायती कथा

- सिंदबादच्या सात सफरी, मराठे -||=
- गलिव्हरचे प्रवास, गोरे -||=
- डॉन क्विक्झोट, शिखरे -||=
- तीन शिलेदार, सौ. आपटे १।
- बाल अरेबियन नाइट्स्, १–२, थोरात, प्र. -|||-
- रॉबिन्सन क्रूसो, सुखटणकर -|-
- रॉबिन हुड, भागवत १||

## मराठी पेहेरावांतील संस्कृत कथा

- मराठी मेघदूतकथा, नवरे -||-
- रघुवंशकथा, ,, 
- दुष्यंत-शकुंतला, महाजन -|-
- मालती–माधव, कारखानीस -|=
- चतुर प्रधान व गुणी राजा, कारखानीस -|=
- हरवलेली आंगठी, जोशी -||-
- वेदांतील गोष्टी, भा. १, श्रोत्रिय १
- वेदांतील गोष्टी, भा. २, ,, १

केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४

# मुलांची स्वप्नसृष्टि

कथावाङ्मय म्हणजे मुलांची एकपरी स्वप्नसृष्टीच. त्यांत वावरण्यांतच त्यांना खरा आनंद वाटत असतो, खरें सुख होत असतें. त्यांचीं मनोराज्यें यांतूनच निर्माण होत असतात. या राज्यांची केव्हां केव्हां सत्यसृष्टीही होते. जे आदर्श, जीं ध्येयें, जे विचार, ज्या कल्पना या वाङ्मयद्वारा त्यांच्यापुढें ठेवण्यांत येतील त्याप्रमाणेंच त्यांच्या प्रवृत्ती बनतील, त्यांच्या आयुष्याला वळण लागेल. यासाठीं मुलांकरितां तयार करावयाचें वाङ्मय अत्यंत जबाबदारीनें तयार केलें पाहिजे. बालवाङ्मयाचें प्रकाशन या धोरणानेंच आम्ही करीत असतों.

गोड गोष्टी, १,२,६, सानेगुरुजी प्र. -|||=
मनूबाबा, ,, -|||=
फुलांचा प्रयोग, ,, -|||=
दुःखी, ,, -|||=
बेबी सरोजा, ,, -|||=
करुणादेवी, ,, -|||=
यति कीं पति? ,, -|||=
चित्रा नि चारु, ,, -|||=
धडपडणारीं मुलें, ,, १|||
शीलाचें मोल, नेरूरकर १
जत्रेंतील जुगार, ,, -||=
खडकावरील अंकुर, ताम्हनकर १|
कुमार, टोंगो -|=
झेलम, ,, -|||-
चंपाराणी, चोरघडे १
प्रभावती, ,, -||-
पबूताईच्या गोष्टी, १-२, भागवत प्र. -|=

लीलावती, रानडे १|
सोव्हिएटच्या समरकथा, भाग १-२, भागवत प्र. १|
तीळगूळ, जोशी ८≡
सोनेरी नदीचा राजा, सौ. दांडेकर -||·
मोत्यांचा मळा, के. नारखेडे -||·
तिंबूनानांचा रेडिओ, प्रो. रानडे -||=
शाम नि शोभा, लिमये -||=
उल्का-फुलें, पुनर्वसु -|≡
गोड गुपित, बर्वे -|||-
कृत्तिका, शैलजादेवी -|||-
मालवते दीप, भंडारी -|||-
मराठ्यांच्या वीरकथा, लेले १||
सोबती, पालवणकर -|||-
माईच्या गोष्टी, भाग १-३, सौ. दांडेकर प्र. १

केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४

# नाटिका, नाट्यछटा, संवाद

सुट्टीच्या दिवशीं, चार संवगडी जमवून, स्वतः पाहिलेल्या नाटकांच्या नकला किंवा स्वतःच इकडून तिकडून गोळाबेरीज करून लिहिलेल्या नाटकांचे प्रयोग, वडील मंडळी घरांत नसतांना ओटीवर किंवा माजघरांत, बाळगोपाळ करीत असतांना आढळतात. घरांत भलतीच करडी शिस्त नसेल, तर आई-ताईच्या, दादा-काकांच्या वस्त्रप्रावरणांवर छुपा हल्ला होऊन, त्यांतील लुटीचा उपयोग नटवेष सजविण्यांत होतो. मुलांची ही नाट्याकडील नैसर्गिक प्रवृत्ति आहे. भावाविष्करणासाठीं तीं धडपडत असतात. ही त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति दडपून टाकतां कामा नये. तिला योग्य वळण लावलें पाहिजे. भावनांवर सुंदर संस्कार करण्यास नाट्यासारखें अन्य प्रभावी साधन नाहीं आणि त्यामुळेंच अध्यापनांत नाट्यीकरणाला अलीकडे फार महत्त्व दिलें जातें. नाट्याचें शिक्षणांतील हें महत्त्व लक्षांत आणून मुलांना विनायास सामान्य सामग्रीवर, घरीं, वर्गांत किंवा सम्मेलनप्रसंगीं करतां येतील असे संवाद, नाटिका व नाट्यछटा आम्हीं प्रसिद्ध केल्या आहेत. मुलांना त्या फार आवडतात.

| | |
|---|---|
| सिंहगड, परचुरे | -॥- |
| जंगल्या भिल्ल, शुक्ल | -।- |
| शर्मिष्ठा, कारखानीस | -।- |
| नवलनगरची राजकन्या, शुक्ल | -।- |
| पाहुण्यांची हकालपट्टी, भोंग | -।≡ |
| बालवीर, पंडित | -।- |
| हंसरीं नाट्यसुमनें, मुंडले | -।॥- |
| संगीत संवाद, कामत | -।॥- |
| विरामचिन्हांची मेजवानी, नाईक | -।- |
| मुलींची शाळा, नेरूरकर | ८= |
| शाळेसाठीं, ताम्हनकर | -।- |
| नाट्यछटा व संवाद, पंडित | -।- |
| घटकाभर करमणूक, टिळक | -॥- |

केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४

# मुलांसाठीं गोड गोड गाणीं

गाणीं आणि गोष्टी यांचें नांव काढलें कीं मुलांचा चेहेरा कसा खुलतो! किती आसुलेलीं असतात तीं त्यांसाठीं! म्हणूनच तर त्यांच्यासाठीं हीं खालील पुस्तकें तयार केलीं.

| | |
|---|---|
| जाईचा कुंज, कुसुमाग्रज | ०– ६–० |
| मोतीबाग, राजकवि यशवंत | ०–१०–० |
| गूळखोबरें, सौ. अपर्णा देशपांडे | ०– ४–० |
| चैत्रपालवी, वि. म. भुले | ०– ३–० |
| किलबिल, वा. गो. मायदेव | ०– ६–० |
| चांदोबाच्या निळ्या घरीं, अशोक | ०–१२–० |
| फुलबाग, वैद्य-पाटील | ०– ४–० |
| चिमुकलीं बालगीतें, भा. म. वैद्य | ०– ४–० |
| गीतांजली, तांदळे-लोंढे | |
| शिशुगीतें, जानकीबाई विद्वांस | |
| किशोरसंगीत, वीरकर-मटंगे | ०–१४–० |
| अभिनयगीत, वा. गो. मायदेव | ०– ६–० |
| बालविहार, वा. गो. मायदेव | ०– ६–० |
| बालगीतें, भा. ना. रानडे | ०– ७–० |
| रवींद्रनाथांचा शिशु, म. का. कारखानीस | १– ०–० |

केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४

# या रत्नांना ओळखतां का तुम्ही ?

'गृहरत्नां'तील रत्नांहून वेगळ्या मासल्याचीं आहेत हीं रत्नें. जरूर त्यांच्याशीं परिचय करून घ्या. पुनः पुन्हा त्यांना भेटावेंसें वाटेल तुम्हांला.

**चंदू** ना. दि. श्री. शं. खानवलकर

मेहता, खट्याळ व खोडकर, पण त्यांत धाडस व पराक्रम विलक्षण. अवखळ खरा, पण बेट्याची बुद्धि मोठी तल्लख. त्याच्या करामती कौतुक करण्यासारख्या आहेत अगदीं.

भाग पहिला एक रुपया
भाग दुसरा सव्वा रुपया

**चिंगी** ना. धों. ताम्हनकर

भारी उपद्व्यापी नि उच्छृंखल. हद्द आली तिच्या धडपडीपुढं. तिची एकेक गोष्ट काय सांगावी...! ती पुस्तकांतूनच वाचलेली बरी.

सव्वा रुपया

**गोट्या** ना. धों. ताम्हनकर

या मुलानें तर, अख्ख्या महाराष्ट्रांत गडबड उडवून दिली. सारेंच कांहीं याचें मुलखावेगळें. पण सरळ आणि न्यायाला धरून; अवघांडपणा कुठेंच नाहीं. वयाला न शोभणारें शहाणपण म्हणून हसूं येतें. कौतुकाचेंच हसूं म्हणा ना तें!

भाग १–२–३ : प्रत्येकीं एक रुपया

**किशोर** वि. भि. पेटकर

किशोर जितका प्रेमळ, नम्र नि कोमल वृत्तीचा मुलगा होता, तितकीच त्याला अन्यायाची चीडही होती. म्हणून तर त्याचे मित्र आब्बास नि रोहिदास त्याला इतके चाहत असत. एक रुपया

**बंडखोर बंड्या** नाईक–गुरव

सत्तावन सालच्या बंडांतही तो होता असें फाल्गुनरावांना कोणींतरी सांगितलें होतें म्हणे! पण बंड्याबद्दल हळुहळू निराश बनत चाललेल्या वडिलांना त्यानें हमी तर मोठी जोराची दिली, "सांगलीला जाऊन इंग्रजी शिकतों नू पट्ट्या मग येरवड्यालाच जातो!"

एक रुपया

**चेंडू, गोंडू आणि मंडळी**

शांतिलाल भंडारी

जिच्या अंतःकरणांत स्वाभिमानाची ज्योत अखंड तेवत आहे, त्या बाल-मंडळीची गमतीदार गोष्ट. चौदा आणे

**टिल्लू** शांतिलाल भंडारी

टवाळ, खोडकर, पण तितकाच थोर मनाचा आहे. खेळाडू, उत्साही नि हुशारही तसाच. चौदा आणे

के श व भि का जी ढ व ळे, मुं ब ई ४


IRBK-0104060

# या रत्नांना ओळखतां का तुम्ही ?

'गृहरत्नां' तील रत्नांहून वेगळ्या मासल्याचीं आहेत हीं रत्नें. जरूर त्यांच्याशीं परिचय करून घ्या. पुनः पुन्हा त्यांना भेटावेंसें वाटेल तुम्हांला.

**चंदू** श्री. शं. खानवेलकर

मोठा खट्याळ व खोडकर. पण त्यांत धाडस व पराक्रम विलक्षण. अवखळ खरा, पण वेड्याची बुद्धि मोठी तल्लख. त्याच्या करामती कौतुक करण्यासारख्या आहेत अगदीं.

भाग पहिला एक रुपया
भाग दुसरा सव्वा रुपया

**चिंगी** ना. धों. ताम्हनकर

भारी उपद्व्यापी नि उच्छृंखळ. हद्द झाली तिच्या धडपडीपुढें. तिची एकेक गोष्ट काय सांगावी...! ती पुस्तकांतूनच वाचलेली बरी.

सव्वा रुपया

**गोट्या** ना. धों. ताम्हनकर

या मुलानें तर, अख्ख्या महाराष्ट्रांत गडबड उडवून दिली. सारेंच कांहीं याचें मुलखावेगळें. पण सरळ आणि न्यायाला धरून; अवधांडपणा कुठेंच नाहीं. वयाला न शोभणारें शहाणपण म्हणून हसूं येतें. कौतुकाचेंच हसूं म्हणा ना तें !

भाग १-२-३ : प्रत्येकीं एक रुपया

**किशोर** वि. भि. पेटकर

किशोर जितका प्रेमळ, नम्र नि कोमल वृत्तीचा मुलगा होता, तितकीच त्याल अन्यायाची चीडही होती. म्हणून त्याचे मित्र आव्बास नि रोहिद्र त्याला इतके चाहत असत. एक रुपया

**बंडखोर बंड्या** नाईक-गु

सत्तावन सालच्या बंडांतही तो होत असें फाल्गुनरावांना कोणींतरी सांगि होतें म्हणे ! पण बंड्याबद्दल हळु निराश बनत चाललेल्या वडिल त्यानें हमी तर मोठी जोराची दि "सांगलीला जाऊन इंग्रजी शिक न पट्या मग येरवड्यालाच जातो

एक रु.

**चेंडू, गोंडू आणि मंडळी**

शांतिलाल भं

जिच्या अंतःकरणांत स्वाभिमान ज्योत अखंड तेवत आहे, त्या बाल मंडळीची गमतीदार गोष्ट. चौदा आ

**टिल्लू** शांतिलाल भंडार

टवाळ, खोडकर, पण तितकाच थो मनाचा आहे. खेळाडू, उत्साही ि हुशारही तसाच. चौदा आणे

केशव भिकाजी ढवळे, मुंबई